cmyk

## संपादकीय

### महाराष्ट्राच्या हितासाठी टाळी वाजावी !

मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार का? असा सवाल गत अनेक वर्षापासून सतत विचारला जात आहे. अभिनेते–दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'वास्तव द ट्रूथ' या यूट्युब चॅनेलसाठी राज ठाकरे यांची मुलाखत घेताना पुन्हा तोच प्रश्न विचारण्यात आला आणि शिळ्या कढीला ऊत आला. राज ठाकरे यांनी राजकारणाला शोभेल असे उत्तर देताना म्हटले की, आमच्यातील वाद, भांडणे छोटी आहेत. त्या वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे त्यामुळे एकत्र येणे कठीण नाही; पण विषय इच्छाशक्तीचा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना म्हटले की,


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–०३ | मंगळवार, दि.२२ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### मुर्शिदाबाद हिंसाचार : एसटीएफने ओडिशामध्ये १२ संशयितांना घेतले ताब्यात

कोलकाता : प. बंगालमध्ये वक्फ संशोधन कायद्याविरोधात झालेल्या आंदोलनादरम्यान मुर्शिदाबाद जिल्ह्यात झालेल्या हिंसाचारप्रकरणी पश्चिम बंगाल एसटीएफने ओडिशात १२ संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला मुर्शिदाबाद जिल्ह्यात हिंसाचार झाला होता. यामध्ये पिता–पुत्रासह तीन जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी या प्रकरणाच्या तपासासाठी पश्चिम बंगाल सरकारने विशेष तपास पथक स्थापन केले आहे. या नऊ सदस्यीय एसआयटीचे नेतृत्व डीआयजी (मुर्शिदाबाद रेंज) करणार आहेत. पथकात गुप्तचर शाखेचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक, सीआयएफ आणि सीआयडीचे दोन उपाधीक्षक, चार निरीक्षक, ट्रॅफिक पोलीस निरीक्षक आणि सुंदरबन पोलीस जिल्ह्याच्या सायबर गुन्हे शाखेचे अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

» शिवसंग्रामच्या पुण्यातील बैठकीत राज्यस्तरीय सदस्य नोंदणीची सुरवात

# कर्जमाफीपेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर भर द्यावा

## सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वर्षे करा ; ज्योती मेटे यांची शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीत मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, वारंवार कर्जमाफीवर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यांच्या कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासहकृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्रालाबिगरशेती क्षेत्राची जोड, कृषी व सहकार विभागातील समन्वय आणि सहकार व महसूल विभागाच्या समन्वयातून खरीप व रब्बी हंगामात १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावे,'अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली.**

पुण्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात शिवसंग्राम पक्षाची राज्यस्तरीय बैठक पार पडली. त्यानंतर ज्योती मेटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश चिटणीस योगेश विचारे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, ज्येष्ठ पदाधिकारी शेखर पवार, वसंत पाटील, पी. के. चव्हाण यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व




पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्योती मेटे म्हणाल्या, ''आजच्या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व स्मृतीस्थळ, तसेच पानिपत येथील मराठ्यांच्या शौर्य इतिहासाच्या प्रतिक असलेले स्मृतीस्थळ उभारणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करते. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होऊनही स्मारकाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष देऊन मुंबई उच्च न्यायालय, तसेच सर्वोच्च न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडून स्मारकाचे कामकाज त्वरित सुरु करावे. स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांचे होदेगिरी (दावणगिरी) कर्नाटक येथे स्मृतीस्थळ उभारणेबाबत कार्यवाही करावी.' केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांच्या स्टार्टअपसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने महिलांच्या स्टार्टअपला प्रोत्साहन मिळण्यासाठी

◄◄ पान २ वर

## थोडक्यात...

### माझ्या शब्दांची 'ते' कधीही तोडमोड करतील–चंद्रकांत पाटील

मुंबई–शरद पवार आणि संजय राऊत हे त्यांच्या राजकीय गरजेपोटी माझ्या शब्दांची कधीही तोडमोड करतील, अशा शब्दात शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटल यांनी टीका केली आहे. भाजपाला पाच हजार वर्षापूर्वीचा इतिहास आहे,असे पण आपण कधीच बोललो नाही, सध्या एआय आहे, त्यातून शोधून काढा, असे मत देखील त्यांनी व्यक्त केले आहे.

### उजनी धरणाची पाणीपातळी मायनस ४.७३ टक्के

लातूर–राज्यात उष्णतेचा तडाखा वाढला असून पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. या ३ जिल्ह्यांसाठी वरदान ठरलेले उजनी धरण एप्रिलच्या मध्यावरच मायनसमध्ये गेले आहे. आता उजनी धरणात उपयुक्त पाणीसाठा मायनस ४.७३ टक्के असल्याचे म्हटले जात आहे. सध्या उजनी धरणामधून भीमा नदी तसेच मुख्य कालवा आणि इतर पाणी योजनांद्वारे ७ हजार ५१० क्युसेक्सने विसर्ग सुरू आहे. त्यामुळे उजनी धरणातील पाणीपातळी झपाट्याने कमी होत आहे.

### पूजा खेडकर प्रकरणाची २ मेला पुढील सुनावणी

नवी दिल्ली–पूजा खेडकर प्रकरणाची पुढील सुनावणी २१ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. मात्र २ मे रोजी सकाळी १०.३० वाजता क्राइम ब्रांच समोर हजर राहण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने पूजा खेडकरला दिले आहेत. जोपर्यंत चौकशीत सहकार्य करेल तोपर्यंत अटकेपासून संरक्षण कायम राहील असे न्यायालयाने नमूद केले आहे.

### उद्धव ठाकरे– राज ठाकरे एकत्र यावे ही महाराष्ट्राची भावना–संजय राऊत

मुंबई–उद्धव ठाकरे– राज ठाकरे यांनी एकत्र यावं ही महाराष्ट्राची भावना आहे. दोन्ही ठाकरेंनी आपल्या भावना मांडल्या आहेत. ठाकरे बंधू एकत्र आल्यावर शेतात जावं लागेल अशी काहींची भावना आहे. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याबाबत काहींना भीती वाटत असेल, असे संजय राऊत म्हणाले.

### धाराशिवची लेक फडकवणार विदेशात तिरंगा

धाराशिव–पार्थसारथीची ज्युनिअर बिली जीन किंग कप टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली असून १२ ते १७ मे दरम्यान होणार स्पर्धा पार्थसारथी अरुण मुंढे ही धाराशिव तालुक्यातील हिवर्डा गावची रहिवाशी कझाकिस्तान येथे होणाऱ्या ज्युनिअर बिली जीन किंग कप या प्रतिष्ठीत टेनिस स्पर्धेसाठी भारताच्या संघात निवड पार्थसारथीने राष्ट्रीय स्पर्धेत सलग दोन वेळा १४ वर्ष वयोगटात मिळवले उपविजेतेपद ती सध्या महाराष्ट्रातील क्रमांक १ ची टेनिसपटू असून तिचा भारतात १६ वर्ष वयोगटात ४ था तर १९ वर्ष वयोगटात १० वा क्रमांक आहे.

### मुंबई विमानतळ सहा तास बंद राहणार

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ धावपट्टीच्या दुरुस्ती आणि देखभालीच्या कामासाठी ९ मे रोजी सहा तास बंद राहणार आहे. सर्वाधिक व्यस्त विमानतळ अशी मुंबईची ओळख आहे. पावसाळ्यात विमानांचे सुरक्षित लँडिंग व टेक ऑफ होण्याकरिता दुरुस्तीचे काम केले जाणार आहे.

## माजलगाव पुन्हा हादरले

# ढाबा मालकाचा खून

### भांडण सोडवण्यास गेल्यावर केला हल्ला सहा जणांविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

दारू पिऊन आपसात वाद करणाऱ्याचे भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या ढाबा चालकाच्या डोक्यात लाकडाची ढिलपी घालून खून करण्यात आल्याची दुर्दैवी घटना माजलगाव शहरापासून जवळच असणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या नागडगाव फाट्यावर असणाऱ्या गावरान ढाब्यावर दि २० एप्रिल रविवार रोजी संध्याकाळी ७:०० वाजण्या



सुमारास घडली.सदरील मारामारीत ढाबा मालकाचा मुलगा गंभीर जखमी झाला तर एक स्वयंपाकी ही जखमी झाला आहे.दरम्यान याप्रकरणी साहा जणाविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलिसात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाच च दिवसात लागोपाठ दुसऱ्या खुनाची घटना घडल्यामुळे माजलगाव शहर हादरलं असून पोलीसांच्या कायद्याच्या

◄◄ पान २ वर

# शरद पवारांचे हे शिलेदार मंत्री होणार

## लक्ष्मण हाकेंच्या गौप्यस्फोटाने राजकीय वर्तुळात खळबळ



### नेमकं काय म्हणाले लक्ष्मण हाके?

पवार कुटुंबीय कधीच वेगळे नव्हते. पवार कुटुंब नेहमी सत्तेत राहाणारं आहे, त्यामुळे मला नाही वाटत ते फार काळ सत्तेच्या बाहेर राहू शकतील असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. दरम्यान पुढे बोलाताना त्यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. महाविकास आघाडीमध्ये सर्व पक्ष विशेषत: राष्ट्रवादी पक्ष शरद पवार हे सत्तेच्या बाहेर कधीच राहू शकत नाहीत, भुजबळ यांना मंत्रिपदावरून डावलण्यात आले, कारण ती जागा एकतर रोहित पवार किंवा जयंत पाटील यांना ठेवली होती, असे हाके यांनी म्हटले आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोमवारी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामध्ये बैठक झाली. या बैठकीवर बोलताना लक्ष्मण हाके यांनी जोरदार निशाणा साधला आहे. ते म्हणाले, शरद पवार हे जास्त काळ सत्तेबाहेर राहू शकत नाहीत, ते कधीही सत्तेत सहभागी होऊ शकतात. त्यांच्या दोन शिलेदारांपैकी एकजण मंत्रीपदाची शपथ घेऊ शकतो, असा गौप्यस्फोट केल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ माजली आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामध्ये

◄◄ पान २ वर

# अंत्योदय म्हणजे शासनाच्या अनेक हितकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविणार–आ.धस

## कुसळंब येथे माऊली जरांगे यांच्या प्रयत्नाने आयोजित बांधकाम कामगारांना साहित्य वाटप

**आष्टी । प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे,कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मदत करणे हे यासह अन्य फायदा मिळवून देणं हे या योजनेच मूळ वैशिष्ट असून त्यासाठी ही योजना आहे याचा फायदा सर्वांनी घ्यावा असे आवाहन परंतु यामध्ये वंचित असलेला मजूर कामगार याला या योजनेचा प्राधान्याने फायदा झाला पाहिजे. शेवटी अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या घटका पर्यंत शासनाच्या योजनेचा फायदा हा सर्वसामान्यांना झाला पाहिजे त्यासाठी असे कार्यक्रम वेळोवेळी घेण्याचे काम माऊली जरांगे करतात



ही चांगली बाब असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे आयोजक अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे सदस्य माऊली जरांगे यांच्या प्रयत्नातून आयोजित बांधकाम मजुरांना महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारास घरगुती भांडी व बांधकाम साहित्य वाटप कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बांधकाम कामगार व्यवस्थापक विक्रांत वीर साहेब,आयोजक जि.प.सदस्य माऊली जरांगे,सभापती किरण शिंदे पाटील,दिलीप भराटे,गोविंद गाडे, महेश खेगरे,शाहुराव टेकाळे, श्रीहरी गिते, रामेश्वर गोरे,दादासाहेब पवार,भारत मानमोडे,गोवर्धन सुळे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,शासनाच्या अनेक हितकारी योजना असून २००२ साली मी गाळ उपसा योजनेला आष्टी मध्ये सुरुवात केली त्यानंतर ही योजना शासन स्तरावर अंमलात आणण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतीला उन्नत करण्यासाठी

◄◄ पान २ वर

# सततच्या पराभवामुळे राहुल गांधींच्या मनावर परिणाम – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी परदेशात जाऊन भारताच्या लोकशाहीची बदनामी करत आहेत. वारंवार निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे ते विचलित झालेले असून त्यांच्या मनावर परिणाम झाला आहे. त्यांनी जनतेमधून जाऊन विश्वास संपादन केला पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.२१) पत्रकारांशी बोलताना दिला.**

ते पुढे म्हणाले की, भारताची, भारतीय लोकशाहीची, भारतीय संविधानाने तयार केलेल्या संस्थांची राहुल गांधी बदनामी करत आहेत. परदेशात जाऊन भारताची बदनामी करणे निंदनीय आहे. सतत झालेल्या निवडणुकीतील पराभवामुळे हा परिणाम असून राहुल गांधी विदेशात जाऊन आपल्या देशाबाबत खोटं बोलत आहेत. वारंवार निवडणुका हरल्याने त्यांच्या



मनावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. खरा देशभक्त विदेशात जाऊन देशाची बदनामी करणार नाही. माझा त्यांना सल्ला आहे की, त्यांनी जनतेत जाऊन काम केले पाहिजे. जगभरात बदनामी करून त्यांची मते वाढणार नाहीत. जनतेची विश्वासार्हता मिळवली तरच त्यांची मते वाढतील. आणि निवडणुका जिंकाव्यात. परदेशात भारताची बदनामी करून ते निवडणुका जिंकू शकत नाहीत. उलट त्यांचीच उंची कमी होऊ शकते. ते देशाचे विरोधी पक्षनेते असताना सातत्याने देशाची

◄◄ पान २ वर

## पोप फ्रान्सिस यांचे निधन

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**पोप फ्रान्सिस यांचे निधन झाल्याची माहिती व्हॅटिकनकडून देण्यात आली आहे. सोमवारी सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांचे निधन झाले. त्यांनी त्यांचेसंपूर्ण आयुष्य रोम येथील चर्चच्या सेवेसाठी वेचले. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्य शिकवली. तसेच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असे म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातले वृत्त दिले आहे. व्हॅटिकनकडून एक व्हिडीओ संदेश देण्यात आला. त्या संदेशात पोप फ्रान्सिस यांच्या निधनाचें वृत्त देण्यात आले.**



पोप फ्रान्सिस यांचे सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी निधन रोमन कॅथलिक

◄◄ पान २ वर

# मुंबई २६/११ हल्ल्यात काँग्रेस अन् राष्ट्रवादीचा हात

## भाजप नेते माधव भंडारी यांचा खळबळजनक आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई शहरावर झालेल्या २६/११ च्या हल्ल्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा हात होता. स्थानिक प्रशासनावर प्रभाव असलेल्या व्यक्तीच्या प्रभावाशिवाय इतका मोठा हल्ला घडू शकत नाही, असे पुण्यातील एका पुस्तक प्रकाशनच्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे नेते माधव भंडारी यांनी म्हटले आहे. माधव भंडारी यांच्या या आरोपामुळे खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात निर्दोष सुटलेले विक्रम भावे यांच्या



पुस्तकाचे प्रकाशन पुण्यात झाले. 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी माधव भंडारी यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर मोठा आरोप केला. ते म्हणाले, मुंबईवर हल्ला होणार असल्याची कल्पना सर्वांना होती. स्थानिक प्रशासनावर प्रभाव असलेल्या व्यक्तीचा सहभाग असल्याशिवाय इतका मोठा हल्ला घडणे अशक्य आहे. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, गौरी लंकेश आणि एम.एम. कलबुर्गी या हत्याकांडाद्वारे हिंदुत्ववादी संघटना मोडीत काढण्याचे षढयंत्र रचण्यात आले होते. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणात शरद कळसकर आणि सचिन अंदुरे यांना शिक्षा झाली. परंतु या प्रकरणात ते निर्दोष आहेत. त्यांची सुटका होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही,

◄◄ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ३६.०० क्विंटल | २,४३१ | ३,१०० | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड : ६६.०० क्विंटल | २,००० | २,७५० | २,३८४ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : ४.०० क्विंटल | ५,५०० | ६,६०० | ६,०५० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५३.५० क्विंटल | २,०३८ | २,८५१ | २,५३८ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,४०० | ४,४५० | ४,४३३ |
| हरभरा: ३०.०० क्विंटल | ५,४७५ | ६,००० | ५,५९३ |

# विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा; मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील काही भागात पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर विदर्भातील अनेक भागात पुढील ५ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला.**

धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर जिल्ह्यात पावसाचा अंदाज असून गुरुवार आणि शुक्रवारी उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज देण्यात आला. हिंगोली आणि परभणी जिल्ह्यात बुधवारपासून शुक्रवारपर्यंत उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता आहे. जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस

◄◄ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# महाराष्ट्राच्या हितासाठी टाळी वाजावी !

मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार का? असा सवाल गत अनेक वर्षापासून सतत विचारला जात आहे. अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'वास्तव द ट्रूथ' या यूट्युब चॅनेलसाठी राज ठाकरे यांची मुलाखत घेताना पुन्हा तोच प्रश्न विचारण्यात आला आणि शिळ्या कढीला ऊत आला. राज ठाकरे यांनी राजकारणाला शोभेल असे उत्तर देताना म्हटले की, आमच्यातील वाद, भांडणे छोटी आहेत. त्या वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे त्यामुळे एकत्र येणे कठीण नाही; पण विषय इच्छाशक्तीचा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, आमच्यातील किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला तयार आहे मात्र महाराष्ट्राच्या हितासाठी युती करायची की भाजपसोबत जायचे, हे स्पष्ट करायला हवे. चोरांना पाठिंबा नाही ही शिवरायांची शपथ घ्या. महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कोणी येईल त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, त्याच्या घरी जाणार नाही, हे पहिल्यांदा ठरवा. त्यानंतर महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. जी होती ती आजच मी मिटवून टाकली. कुणासोबत गेल्यानंतर महाराष्ट्राचे, मराठी व हिंदुत्वाचे हित होणार हे ठरवा मग पाठिंबा द्यायचा की विरोध करायचा हे ठरवा. महाराष्ट्राचे हित ही माझी एकच अट आहे. मराठीच्या मुद्यावर एकमत असलेले; पण एकमेकांपासून दूर असलेले ठाकरे बंधू कधी एकत्र येणार? अशी उत्सुकता राज्यातील तमाम शिव आणि मनसैनिकांना लागून राहिली आहे. अनेकदा टाळी देण्याचे प्रयत्न झाले; पण हे बंधू एकत्र येण्याची चिन्हे दिसत नव्हती; पण सध्या स्वत:च्याच अस्तित्वासाठी लढणाऱ्या उद्धव आणि राज ठाकरे यांनी आता मात्र एकमेकांना पुन्हा एकदा टाळी देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे राज्याचे राजकारण पुन्हा एकदा वेगळे वळण घेण्याची शक्यता असून ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता दुणावली आहे.

राजकारणात काहीही होऊ शकते त्यामुळे राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, असे म्हटले जाते. त्यानुसार गत दोन दशकांहून अधिक काळ वेगवेगळी चूल मांडणारे राज आणि उद्धव ठाकरे यांची आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी युती होऊ शकते, असे संकेत आहेत. दोन्ही ठाकरे एकत्र आले तर आम्हाला आनंदच होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोणीही आपल्यातील मतभेद विसरून एकत्र येत असतील तर त्यामध्ये कोणीही वाईट वाटण्याचे कारण नाही, असे ते म्हणाले. ऑफर देणारे आणि त्याला प्रतिसाद देणारे यांच्या बाबत मला जास्त विचारण्यापेक्षा त्यांनाच विचारले पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले. मनसे आणि शिवसेना ठाकरे या दोन्ही पक्षांनी काय भूमिका घ्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. राज आणि उद्धव यांनी एकत्र यावे की नाही या बाबत दुसऱ्या कोण्या राजकीय पक्षाने सांगण्याचे काही कारण नाही. प्रत्येकाने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून जे त्यांना योग्य वाटते, तो निर्णय त्यांनी घ्यावा, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उद्धव आणि राज या दोन्ही भावांनी एकत्र यावं ही लोकभावना आहे. एकत्र आल्यास त्याचा महापालिकेत चांगला परिणाम होऊ शकतो, असे जनमत आहे. सध्या मुंबईत इतर भाषिकांची सुरू असलेली दादागिरी, वाद यामुळे मराठी माणूस नाराजच नाही तर संतापलेला आहे. त्यांना एका चांगल्या पर्यायाची प्रतीक्षा आहे म्हणून गंध, फुले ओरडून सांगताहेत तुमचे व्हावे मिलन.

## संपूर्ण जिल्हा शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू-गणेश महाडिक

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात आगामी सण, उत्सवात शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.२ मे २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.**

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २ मे २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहाला हाजीपुरकरांचा उत्साह कायम

# महंत शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताह सोहळा





**फुलसांगवी । शंकर भालेकर**

**श्री.क्षेत्र नारायण गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शिरूर कासार तालुक्यातील मौजे हाजीपुर येथे गेल्या चार दिवसापासून मोठ्या उत्साही वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताह पार पडत आहे. सर्व गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील भाविक -भक्त या ठिकाणी एकत्रित येऊन या सप्ताहाचा आनंद लुटत असल्याने हाजीपूर मध्ये आगळावेगळा आंदोत्सव पाहायला मिळत आहे.**

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती वै.महंत महादेव महाराज यांच्या संकल्पनेतून मौजे हाजीपुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची उभारणी करण्यात आली होती. हाजीपुरकरांसह परिसरातील जनतेला एकत्रित करून ज्ञानदानासह समाज जनजागृतीचे कार्य या सप्ताहाच्या माध्यमातून करता यावे हा पवित्र उद्देश ठेवून वै.महंत महादेव महाराज यांनी येथील हनुमान मंदिर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची उभारणी केली होती. या कार्याला समस्त ग्रामस्थांनीही मोठे सहकार्य दाखवून हा कार्यक्रम वृद्धिंगत करण्यासाठी मोठा प्रयत्न केला आहे .हाजीपुरकरांना घालून दिलेली अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा दिवसेंदिवस व्यापक होत चालली आहे यामुळे या कार्यक्रमाचा परिसरामध्ये मोठा नाव नावलौकिकही झाला आहे. वै. महादेव महाराज यांच्या पाश्चातही गडाचे विद्यमान मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनीही आपल्या गुरु देवानी घालून दिलेल्या परंपरेला मोठ्या अट्टाहासाने खतपाणी घातले आहे. हा सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता तो सामाजिक एक मोठा उपक्रम कसा होईल व गावकऱ्यांसाठी एक आनंदोत्सव कसा होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. यामुळे हा सप्ताह आला म्हणजे सर्व गावकऱ्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण होऊन सप्ताहाची जोरदारी तयारी करत गावकरी एक आंदोत्सव साजरा करत असतात. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हा सोहळा गेल्या चार दिवसापासून मोठ्या थाटात पार पडत असून या ठिकाणी हाजीपुरकरांसह पंचक्रोशीतील भाविक भक्त एकत्रित येऊन धार्मिक, अध्यात्मिक, ज्ञानमृताच्या सेवनाबरोबर सर्व द्वैतभाव विसरून एक पंगतीला बसून भाजी भाकरीच्या भोजनाचा आनंद लुटत आहेत. गावातील दानशूर दर दिवसच अन्नदानाच्या वेगवेगळ्या पंगती देऊन भाविकांची सेवा करत आहेत.

### महंत भानुदास महाराज शास्त्री यांचे आज कीर्तन

हाजीपुर येथील अखंड हरिनाम सप्ताहमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याप्रमाणे मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी रात्री ८:३० ते १०:३० या वेळामध्ये महंत भानुदास महाराज शास्त्री (श्रीराम संस्थान गोमळवाडा )यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रगत,निपूण महाराष्ट्र कार्यक्रम जरेवाडी पॅटर्न शैक्षणिक कार्यक्रमाची आ. सुरेश धस यांनी केली पडताळणी

**आष्टी । प्रतिनिधी**

**दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी ता.आष्टी या शाळेला आ.सुरेश धस यांनी अचानक भेट देऊन राज्यात सुरू असलेल्या प्रगत निपुण महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत जरेवाडी पॅटर्न कृतीपत्रिका अध्ययन क्षमता दि. २१/ ४ /२०२५ च्या वाचन स्तर, लेखन स्तर, संख्याज्ञान, संख्यावरील क्रिया स्तराची गुणवत्ता पडताळणी केली.**

आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद शाळेतील मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे आणि ठिकाणी देखील नवीन शैक्षणिक धोरणानुसार सतर्क रहावे आणि आपला शैक्षणिक दर्जा राखावा यासाठी व्ही.रमणी पॅटर्न बीड जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यास सुरुवात झालेली आहे तसेच निपुण भारत या डायरेक्ट कृती कार्यक्रमांतर्गत देखील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे आमदार सुरेश धस यांनी याबाबत आग्रहपूर्वक हा कार्यक्रम राबवण्याविषयी मोठे प्रयत्न केलेले आहेत त्याचाच एक भाग म्हणून जरेवाडी पॅटर्ननुसार



प्राथमिक शाळा भवरवाडी अंतर्गत कार्यरत शिक्षकांनी धाराशिव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव चे प्रा.डॉ. जाटनुरे यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार अध्यापनातील विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे भाषा वाचन, लेखन, संख्याज्ञान, संख्या वरील क्रिया या क्षमतांचा अपेक्षित विकास झाल्याचे पाहून आ.सुरेश धस यांनी त्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यां समवेत खेळीमेळी च्या वातावरणात संवाद साधून विद्यार्थ्यांकडून चावडी वाचनही करून घेतले. लेखन कौशल्य विकासा अंतर्गत राबवण्यात येत असलेला सुंदर हस्ताक्षर या उपक्रमाची पाहणी करताना शाळेतील सर्वच १००% विद्यार्थ्यांचे अतिशय सुंदर हस्ताक्षर पाहून आमदार महोदयांनी सुंदर हस्ताक्षराचे मार्गदर्शक शिक्षक अनिल बेदरे सर यांचे कौतुक केले. याप्रसंगी शाळेला नवी प्रशस्त इमारत आणि कमी असलेल्या सर्व भौतिक सुविधांची येत्या शैक्षणिक वर्षात सुविधा करून देण्यात येईल अशी आ.सुरेश धस यांनी घोषित केले. याप्रसंगी संजय भवर, किसन भवर, दादासाहेब भवर, नवनाथ भवर, तुकाराम भवर, प्रविण भवर, हनुमंत मोरे, दत्ता भवर, सागर भवर, विक्रम भवर, संतोष मोरे, संतोष भवर, शरद बागल, गोवर्धन वाहटुळे, अशोक भवर, राम भवर, बंडू भवर, कल्याण भवर, भास्कर भवर, परसराम भवर, शेषेराव भवर, लखन भवर, छगन इंगवले मुख्याध्यापक काकडे सर व अनिल बेदरे सर इ. व अनेक ग्रामस्थ शाळेच्या परिसरात जमा झाले होते.

## कवडगाव येथील चांभारे परिवारातील सात विद्यार्थी झाले ब्लँकबेल्ट

**बीड । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव(बु.)येथील चांभारे परिवारातील ७ विद्यार्थ्यांनि शावलीन मार्शल आर्ट मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.**


हि परीक्षा शावलीन मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र आयोजित ब्लँकबेल्ट परिक्षा दिनांक १८,१९,२० एप्रील २०२५ रोजी उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ या ठिकाणी पार पडली होती. या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना दिनांक २० एप्रिल २०२५ वार रविवार रोजी उमरखेड चे आमदार . मा. किसनराव वानखेडे साहेब यांच्या हस्ते ऊतीर्ण विद्यार्थ्यांना ब्लँकबेल्ट व प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. एकाच घरातील सात विद्यार्थी ब्लँकबेल्ट करणे म्हणजे सोपे नाही. यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते आणि घरच्यांचे देखील पाठबळ असावी लागते असे म्हटले चांभारे परिवाराचे मा आमदार यांनी शब्द सुमनाने स्वागत करून कौतुक केले. या स्पर्धेतील विजेते कु. वैष्णवी



सुर्यकांत चांभारे, कु. प्रियांका राजेभाऊ चांभारे, कु. सुप्रीया सुर्यकांत चांभारे, कु. श्रध्दा बालासाहेब चांभारे, कु. कोमल शिवदास चादर, कु. सोनाक्षी अनिल चांभारे चि. चैतन्य शिवदास चादर या विद्यार्थ्यांनी मार्शल आर्ट मधील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या काठीण्य पातळीत ब्लँकबेल्ट ही परिक्षा ऊतीर्ण केली. विद्यार्थांनी गेली तीन वर्षा पासुन त्यांनी खुप मेहनतीने सर्व मार्शल आर्ट चे वेगवेगळे टप्पे पार पाडुन ब्लँकबेल्ट मिळवीले. विद्यार्थांना प्रशिक्षक बाबु बोबंले सर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे परिसरातील सर्व मित्र परिवार व पालक आदरणीय सुर्यकांत चांभारे सर, . आ. राजेभाऊ चांभारे, आ. बालासाहेब चांभारे आ. शिवदास चादर, आ. अनिल चांभारे यांनी ब्लँकबेल्ट उत्तीर्ण विद्यार्थी व मार्गदर्शक प्रशिक्षक मा. बोबंले सर यांचे मिळाले. या सर्व विद्यार्थ्याचे अभिनंदन करून स्वागत केले.

# खटल्यातील भूसंपादनच्या मोबदल्यावरील व्याजदरात कपात

## शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान, १५ व १२ असलेले व्याजदर आता थेट ७.५ टक्क्यांवर वर



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार जमिनीच्या मोबदल्यासाठी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या खटल्यातील नुकसान भरपाईच्या रकमेवर आता १५ टक्के ऐवजी केवळ ७.५ टक्के व्याज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाने शेतकऱ्यांवर अन्यायाचा आणखी एक घाव बसला असून यामुळे 'शक्तिपीठ' महामार्गाविरोधातील रोष आणखी उफाळण्याची शक्यता आहे.**

भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिला गेल्यास त्यावरील व्याज हे आता बँक व्याज दरापेक्षा एक टक्क दराने अधिक असेल असे विधेयक आणण्यास नुकतीच मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली आहे. २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार कलम ३० (३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ आणि कलम ८० नुसार नऊ आणि १५ टक्के इतके व्याज देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र, या निर्णयामुळे मोबदला देण्यास उशीर झाल्यास शासनाच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पाच्या मूळ खर्चात वाढ होत असे. आता या व्याजदरात बदल करून भूसंपादन मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येणार आहे. हा दर बँक व्याजादरपेक्षा (रेपो दर) फक्त एक टक्का जास्त असेल अशी तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यास उशीर झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.

## पान १ वरून...

### कर्जमाफीपेक्षाशेतकऱ्यांना अर्थक्षम

जिल्हा स्तरावर इनक्युबेशन सेंटर, जिल्हा उद्योग केंद्रामध्ये विशेष कक्ष निर्माण करावा. महाराष्ट्र शासनातील चतुर्थश्रेणी आणि अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय सध्या ६० वर्षे आहे, तर केंद्र शासनासह २५ राज्यांत सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. महाराष्ट्रात मात्र सेवानिवृत्तीचे ५८ वर्षे आहे. त्यामुळे ही बाब अत्यंत अव्यवहार्य आहे. शासन धोरणानुसार ५५ वर्षे वयांवरील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास पात्रतेनुसार तृतीय श्रेणीत पदोन्नती मिळाली तरी निवृत्ती वय ५८ वर्षे असल्याने त्याचा लाभ होत नाही. त्यामुळे राज्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सर्वदूर नाराजीची तीव्र भावना होत आहे. त्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६०वर्षे करावे,'' सरथीची विभागीय कार्यालय कार्यक्षम करावीत परदेशी शिक्षणाच्या सारथीच्या शिष्यवृत्ती करिता असणारी उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात यावी असेही मेटे यांनी नमूद केले. बीडमधील गुन्हेगारीवर बोलताना ज्योती मेटे म्हणाल्या, ''सरपंच संतोष देशमुख यांची हत्या निंदनीय असून, हत्येप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी सुरुवातीपासून करत आहे. यातील आरोपींना अटक झाली आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीडच्या जनतेप्रमाणे आम्हालाही प्रशासन चांगले काम करेल, अशी आशाआहे. अजित पवार यांचा प्रशासनावर वचक असून, अपेक्षेप्रमाणे काम होत असल्याचे दिसून येत आहे. अंबाजोगाईमध्ये वकील महिलेलाझालेली मारहाण चीड आणणारी आहे. अशा घटनांमुळे बीडचीप्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा करणारा राजकीय पक्षाचा कार्यकर्ता किंवा पदाधिकारी याकडे न पाहता कठोर कारवाई करावी, अशीच आमही मागणी आहे.'' आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत शिवसंग्रामचीभूमिका त्यावेळी जाहीर करू. आता शेतकऱ्यांचे, महिलांचे प्रश्न सोडवण्यालाप्राधान्य देत आहोत. तसेच राज्यभरात शिवसंग्रामचीसदस्य नोंदणी मोहीम सुरु असून, पक्षबांधणीवरभर दिला जात आहे. प्रत्येक जिल्ह्यात अधिकाधिक संख्येने शिवसंग्राम पक्षातलोकांना सामावून घेतले जात असल्याचेही मेटे यांनी सांगितले. यावेळी भगवान बाजीराव लंबे जिल्हाध्यक्ष बुलढाणा, धनंजय बाजड जिल्हाध्यक्ष रिसोड मालेगाव विधानसभा या नियुक्त्या देण्यात आल्या तर दादासाहेब चंद्रभान वाघ सरपंच नेवासा , रमेश शेठ लूनिया अहिल्या नगर यांना शिवसंग्राम मध्ये अधिकृत प्रवेश देण्यात आला.

------------

### शरद पवारांचे हे शिलेदार

बैठक झाली. या बैठकीनंतर राजकीय वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या बैठकीवर प्रतिक्रिया देताना लक्ष्मण हाके यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. शरद पवारांची राष्ट्रवादी आणि अजित पवारांची राष्ट्रवादी वेगळी कुठे आहे? मी ती राष्ट्रवादी वेगळी मनातच नाही. ते एकच आहेत. पवार कुटुंबीयांनी महाराष्ट्राला वेड्यात काढण्याचे काम आजपर्यंत केले आहे, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. तसेच शरद पवारांच्या पक्षातील दोन नेत्यांचे नावे घेत त्यापैकी एकजण मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचे सांगून मोठा गौप्यस्फोट केला. त्यानंतर राजकीय गोटात चांगलीच खळबळ माजली आहे.

------------

### माजलगाव पुन्हा हादरले

धाकावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.माजलगाव शहरापासून जवळच राष्ट्रीय महामार्ग-६१ वरील माजलगाव- पाथरी रोडवर नागडगाव फाटा येथे महादेव गायकवाड (रा. मनूर वय ४८ वर्षे) यांचे गावरान ढाबा हॉटेल आहे.या हॉटेलवर दि २० एप्रिल रविवार रोजी संध्याकाळी सात वाजता ७:०० वाजण्याच्या सुमारास साहा इसम मध्यपान करत बसले होते. काही कारणावरून या सहा जणांमध्ये वाद निर्माण झाला. दरम्यान शिवीगाळ हाणामारी सुरू झाली.धाब्यावरील इतर ग्राहकांना याचा त्रास होऊ लागला.त्यामुळे वाद मिटवण्यासाठी ढाबा मालक महादेव गायकवाड मध्ये पडले. त्याचबरोबर महादेव गायकवाड यांचा मुलगा आशुतोष व स्वयंपाकी बुढन हे ही भांडण सोडवण्यासाठी मध्ये पडले.यांनाही मारहाण करण्यात आली.दरम्यान नशेत फुल असणाऱ्या या सहा जणांनी धाब्यावर राडा माजवला. यावेळी एका व्यक्तीकडून महादेव गायकवाड यांच्या डोक्यावर लाकडाची ढिलपी मारण्यात आली.यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना येथील खाजगी दवाखान्यात हलवण्यात आले. दरम्यान गायकवाड यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना बीडला हलवण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला.पुढील उपचारासाठी संभाजी नगरकडे गायकवाड यांना नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.मयत महादेव गायकवाड यांचा मुलगा याच प्रकरणात तोही गंभीर जखमी अवस्थेत असलेला आशुतोष महादेव गायकवाड यांच्या फिर्यादीवरून रोहित शिवाजीराव थावरे व इतर ५ जन रा.आनंदगाव तालुका माजलगाव यांचे विरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच च दिवसापूर्वी १५ एप्रिल रोजी बाबासाहेब आगे यांचा निर्गुण खून भररस्त्यावर करण्यात आल्याची घटना घडली होती. यातच ही दुसरी खुनाची घटना घडली.एका पाठोपाठ पाच च दिवसात खुनासारख्या दोन गंभीर घटना माजलगाव परिसरात घडल्यामुळे गुंडांच्या दहशतीचे सावट शहरावर पसरलं आहे.त्यामुळे पोलिसांच्या धाकावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे

-------------

### सततच्या पराभवामुळे राहुल गांधींच्य

बदनामी करत आहेत. त्यामुळे संशय निर्माण होत आहे की, ते नेमका कुणाचा अजेंडा चालवत आहेत. हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली विधानसभा निवडणुका ते हारले आणि आता ते मतदान प्रक्रियेवर आणि मतदार यादीवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. अतिशय बाळबोधपणाचा हा प्रकार आहे. त्यामुळे त्यांनी जनतेत जाऊन भारताची बदनामी करणे बंद करावे, असे आमचे त्यांना आवाहन आहे.

----------

### अंत्योदय म्हणजे शासनाच्या अनेक

शेत शिवार पोषिक करण्यासाठी तलावातील गाळ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,शिवाय यामुळे गाळ उपसा झाल्याने या तलावातील पाणी पातळी वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे ही आ.सुरेश धस म्हणाले. यावेळी माऊली जरांगे बोलताना म्हणाले, आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजना शेतकरी असो की,सर्वसामान्य नागरिक प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यासाठी काम आम्ही कार्यकर्ते करत असतो.यामध्ये कधीच राजकारण करत नाही.प्रत्येक योजना प्रत्येक घटकापर्यंत पोहचवीत आहोत.सामान्य माणूस आहे आणि ही योजना त्यांच्या पर्यत आ.धस यांच्या आदेशाने ती पोहच करणार असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी अंमळनेर जिल्हा परिषद गटातील नागरिक व लाभार्थी तसेच कुसंळब ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### मुंबई २६/११ हल्ल्यात काँग्रेस

असे माधव भंडारी यांनी म्हटले. गुजरात दंगलीचा उल्लेख करत माधव भंडारी म्हणाले, हिंदुत्वाला बदनाम करण्याचे काम गुजरातमधील दंगलीपासून सुरू आहे. देशात राजकीय बदल झाल्यानंतर व्यवस्थेमुळे हिंदुत्ववादी संघटनांना बदनाम केले जात आहे. कारण व्यवस्था म्हणजे पोलीस, महसूल, न्यायव्यवस्था तिच आहे. ही व्यवस्था बदलण्याचे मोठे आव्हान आहे, असे त्यांनी म्हटले.

**भंडारींच्या अकलेचे दिवाळे निघाले – वड्डेट्टीवार**

माधव भंडारी यांच्या आरोपानंतर काँग्रेस नेते विजय वड्डेट्टीवार यांनी त्यांच्यावर जोरदार हल्ला केला आहे. ते म्हणाले, रस्त्यावरच्या सडकछाप व्यक्तीने करावे, असे हे आरोप आहेत. त्यांच्याकडे कुठला पुरावे आहे. एखाद्या राजकीय पक्षाविरोधात असे गंभीर आरोप करणे म्हणजे माधव भंडारी यांच्या अकलेचे दिवाळे निघाले आहेत.

**माधव भंडारी आऊटडेटेड बॅटरी – अमोल मिटकरी**

भंडारी यांची मानसिक स्थिती ढासळली आहे, त्यांना उपचाराची गरज असल्याचा टोला आमदार अमोल मिटकरी यांनी लगावला आहे. उतारवयात विधानपरिषदेवर संधी न मिळाल्याने त्यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याय. त्यांच्या उपचारासाठी काही सहकार्य लागलं तर राष्ट्रवादी तन-मन-धनाने भंडारींना सहकार्य करणार आहे, असे म्हणत अमोल मिटकरी यांनी माधव भंडारींवर बोचरी टीका केली. भंडारींना पक्षात कोणीच विचारत नाहीय. ते आऊटडेटेड झालेली बॅटरी असल्याचा टोला देखील मिटकरी यांनी लगावला आहे.

-------------

### पोप फ्रान्सिस यांचे निधन

चर्चचे पहिले लॅटिन अमेरिकन पोप फ्रान्सिस यांचं निधन झाले. त्यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. सोमवारी सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.

-----------

### विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा; मराठवाडा,

उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता वर्तविण्यात आली. विदर्भात उन्हाचा चटका चांगलाच वाढला आहे. अकोला जिल्ह्यातील काही भागात पुढील ५ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातही काही ठिकाणी उष्णतेची लाट राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात गुरुवारपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी मंगळवार, बुधवार आणि गुरुवारी उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. वर्धा जिल्ह्यात बुधवारी आणि गुरुवार उष्णतेची लाट राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५



## नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पंतप्रधान नागरी सेवा उत्कृष्टता पुरस्कार २०२३ प्रदान

नवी दिल्ली : नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना 'पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी शर्मा यांना हा पुरस्कार 'जिल्ह्यांचा समग्र विकास' श्रेणीत मिळाला.

१७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त आज विज्ञान भवन येथे केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयाच्या अंतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागा मार्फत या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्याने आयुष्मान भारत, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, उज्वला योजना, मुद्रा योजना, पोषण आहार योजना, स्वनिधी योजना आणि पीएम विश्वकर्मा योजना यासह केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला. केंद्र सरकारच्या सर्वेक्षणात नाशिकच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत शर्मा यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.


# नागपूर घोटाळ्यानंतर शिक्षण विभागाला खडबडून जाग!

## शिक्षकांचे पोस्ट मॅपिंग सुरु! राज्यभरात हजारो बोगस शिक्षक!!

बीड । प्रतिनिधी

नागपूर बोगस शिक्षक भरती घोटाळा उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभाग खडबडून जागा झाला आहे राज्यभरातील शिक्षकांचे पोस्ट मॅपिंग सुरु करण्यात आले आहे. यामध्ये तब्बल अकरा हजारापेक्षा जास्तच शिक्षक बोगस भरती झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता राज्यभरातील शिक्षकांचे धाबे दनानले आहेत. नागपूर विभागातील घोटाळा चव्हाट्यावर येताच शिक्षण खाते खडबडून जागे झाले. अवघ्या आठवडाभरात राज्यातील साडेपाच लाख शिक्षकांचे पोस्ट मॅपिंग आटोपले आहे.विद्यार्थीसंख्येनुसार संचमान्यतेत शिक्षकाचे पद मंजूर केले जाते. तर शालार्थ आयडी असलेल्या शिक्षकाचे वेतन देयक ऑनलाईन प्रणालीतून मंजूर होते. त्यामुळे 'संचमान्यता' आणि 'शालार्थ प्रणाली' या दोन्हीतील शिक्षकसंख्या जुळविण्यासाठी पोस्ट मॅपिंग केले जाते. मंजूर पदांपेक्षा अधिक पदांचा पगार दिला जातोय का, हे यात स्पष्ट होते.

वास्तविक, शिक्षण संचालनालयाच्या स्तरावरुन दोन वर्षांपूर्वीच म्हणजे जानेवारी २०२३ मध्ये ही प्रक्रिया सुरु करण्यात आली. मात्र पितळ उघड होणार असल्याने बहुतांश शाळांनी तांत्रिक कारणे सांगत शालार्थमध्ये पोस्ट मॅपिंग करणे तब्बल दोन वर्षे टाळले. ३१ मार्च २०२५ ही अंतिम मुदत देऊनही राज्यातील एकाही जिल्ह्यात १०० टक्के पोस्ट मॅपिंग करण्यात आले नाही.



मात्र आता नागपूर विभागात बनावट शालार्थ आयडी, बनावट कागदपत्रांद्वारे शिक्षक नियुक्तीचे प्रकरण उघडकीस आले.

यात थेट शिक्षण उपसंचालकालाच अटक झाल्याने राज्यभरातील यंत्रणा शालार्थमधील पोस्ट मॅपिंगच्या मुद्यावर खडबडून जागी झाली. 'पोस्ट मॅपिंग टाळणार्या जिल्ह्यांमध्ये मान्य पदांपेक्षा जास्त पदांचे वेतन आहरित केले जात आहे' अशी थेट शंका शिक्षण संचालनालयाने १५ एप्रिल रोजी दिलेल्या आदेशात नमूद केली आहे.

१९ एप्रिलपर्यंत प्रत्येक शाळेचे पोस्ट मॅपिंग पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. या तारखेला काम पूर्ण न करणार्या वेतनपथक अधीक्षकांना २१ एप्रिलला थेट पुण्यात बोलावून झाडाझडती घेतली जाणार आहे. या तंबीमुळे पोस्ट मॅपिंगचा आकडा ३२ हजारांवरून चक्क साडेपाच लाखांवर गेला आहे. मात्र अजूनही दीड लाख पदांचे मॅपिंग शिल्लक आहे.

तर टळला असता घोटाळा

दोन वर्षांपासून राज्यातील उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, पालिकांचे प्रशासन अधिकारी, वेतन पथकांचे अधीक्षक अशा सर्वच जबाबदार अधिकार्यांकडून पोस्ट मॅपिंगवर दुर्लक्ष झाले. २०२३ चा सप्टेंबर उजाडल्यावर संचालनालयाला 'पोस्ट मॅपिंगविना शालार्थमध्ये वेतन देयकच जनरेट होणार नाही' असा इशारा द्यावा लागला. मात्र शिक्षक संघटनांच्या दबावापुढे संचालनालय झुकले.

त्यानंतर पुढचे वर्ष दीड वर्ष पोस्ट मॅपिंग टाळण्याचाच राज्यातील शाळांनी प्रयत्न केला. शालार्थ प्रणालीत पोस्ट मॅपिंग करताना संचमान्यतेपेक्षा अधिक पदे आढळल्यास ती 'डिलिट' करावी, असा आदेश २०२३ मध्येच तत्कालीन माध्यमिक शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील आणि प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिला होता. या आदेशाचे काटेकोर पालन झाले असते, तर बनावट शालार्थ आयडीचा घोटाळा टळला असता किंवा दोन वर्षांपूर्वीच उघड झाला असता.

## जनता विद्यालयात पालक मेळावा संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता वस्तीगृह शिक्षण संस्थेचे जनता विद्यालयात येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. २० एप्रिल रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम जनता उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रशस्त इमारतीमध्ये संपन्न झाला.



या कार्यक्रमास धानोरा व परिसरातील सर्व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सय्यद अब्दुलभाई, सचिव विजयकुमार (अण्णा) बांदल, व्यवस्थापक विशाल (भैय्या) बांदल, मुख्याध्यापक सय्यद युनूस (राजू मास्टर), उपमुख्याध्यापक ढोबळे सर, पर्यवेक्षक सय्यद अय्युब सर, तसेच सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावातील अनेक प्रतिष्ठित पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री सय्यद अय्युब सर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी गरजेच्या सुधारणा, दिशा-दशा आणि येणाऱ्या काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर अशी माहिती दिली. संस्थेचे व्यवस्थापक विशाल भैय्या बांदल यांनी पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून शाळेच्या वाटचालीबाबत सकारात्मक विचार मांडले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन पठाण सर यांनी तर उपस्थितांचे आभार श्री झांजे सर यांनी केले. या कार्यक्रमास योगेश बेद्रे, ईश्वर शेळके, सतीश काळे, अजीम सय्यद, गणेश काळे, इलियास सय्यद, तुषार शेळके आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्षय्य तृतीयेसाठी मोदी ज्वेलर्स ग्राहकांच्या सेवा व स्वागतासाठी सज्ज

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतासारख्या सांस्कृतिक देशात सणांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्रत्येक सण हा देशवासीय मोठ्या हर्षोल्हासात साजरा करतात. याचप्रमाणे अक्षय्य तृतीया हा सण साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक असा मानला जातो. या दिवशी अनेक नवीन उपक्रम, उद्घाटन खरेदी केल्या जाते. यासाठीच अक्षय्य तृतीया साठी अंबाजोगाई शहरातील मोदी ज्वेलर्स हे ग्राहकांसाठी अनेक नवनवीन प्रकारचे दागिने घेऊन आले आहे. अक्षय्य तृतीया हा दिवस हा सोने खरेदीसाठी अत्यंत शुभ असा मानला जातो. त्यामुळे यंदाच्या अक्षय्य तृतीयेसाठी मोदी ज्वेलर्स घेऊन आलेल्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची असंख्य लेटेस्ट व्हरायटीज ग्राहकांच्या पसंतीस पडतील असा विश्वास पेढीचे संचालक भूषण मोदी यांनी व्यक्त केला आहे. सध्या सोन्याचे भाव दिवसेंदिवस गगनाला भिडत असल्याने अक्षय्य तृतीयेसाठी आगाऊ बुकिंग करण्याकडे ग्राहकांचा कल असल्याचेही मोदी यांनी सांगितले.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक म्हणून महत्त्वाचा मानला जाणारा हा मुहूर्त असल्याने या दिवशी लोक सोन्याचे दागिने, नवीन घर, गाडी इत्यादी वस्तू खरेदी करतात. विशेष म्हणजे या सणाच्या काळात उन्हाळी सुट्ट्या असल्याने सासरहून माहेरसाठी अनेक जणी आपल्या गावी येतात . त्यांच्यासाठी देखील मोदी ज्वेलर्स या शोरूम मधील असंख्य नवीन व्हरायटीज मधील शॉर्ट मंगळसूत्र, लाँग मंगळसूत्र, पेंडंट, कानातील आभूषणे त्याचबरोबर विविध डिझाइन मधील अंगठ्या एकदा तरी पहाव्यात अशाच आहेत.

यासोबतच २२ कॅरेट हॉलमार्क दागिन्यांमध्ये कलकत्ता कलेक्शन, पेशवाई टेम्पल ज्वेलरी, अरबी कलेक्शन ,दुबई पॅटर्न तसेच मॅट फिनिश आदी कलेक्शन मधील मंगळसूत्र, नेकलेस, बांगड्या, कानातील दागिन्यांची लेटेस्ट व्हरायटीही आहे. समृद्धीचे प्रतीक आणि भविष्यासाठी भरोष्याची गुंतवणूक म्हणून सोन्याकडे आजही प्राधान्याने पाहिले जाते. अक्षय्य तृतीयेसारख्या सणांमुळे सर्वसामान्य ग्राहक आवर्जून मुहूर्ताची खरेदी करतो. ग्राहकांचा दागिने खरेदीचा आनंद शतगुणीत व्हावा, ग्राहकांचे हित जोपासले जावे , ग्राहक देव भव याला प्रथम प्राधान्य मोदी ज्वेलर्समध्ये दिले जात असल्याने अल्पावधीतच मोदी ज्वेलर्स ही ग्राहकांची हक्काची पेढी बनली आहे. याहीवर्षी अक्षय्य तृतीयेला ग्राहकांनी , माहेरवाशीणींनी पेढीला अवश्य भेट द्यावी असे आवाहन मोदी ज्वेलर्सच्या वतीने संचालक भूषण मोदी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अकरा ग्रामपंचायतच्या आरक्षणाची सोडत, मुलीच्या हस्ते प्रक्रिया पूर्ण

अंबड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पंचाळ यांचे आदेशाने अंबड तालुक्यातील एकूण १११ ग्रामपंचायत च्या आरक्षणाच्या अनुषंगाने जाहीर प्रकटन दिनांक ११, ४ ,२०२५ रोजी लावण्यात आले होते. त्याअन्वये आज दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय अंबड येथील सभागृहामध्ये तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व पुलकित सिंग सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या मार्गदर्शनाने आरक्षण सोडत पूर्ण करण्यात आली. सदर वेळी तालुक्यातील शंभर ते दीडशे नागरिक उपस्थित होते.

अंबड तालुक्यातील १११ ग्रामपंचायत पैकी अनुसूचित जाती याकरिता १४ ग्रामपंचायत आल्या सदर वेळी १९९५ ते आज पर्यंतचा आरक्षणाचा डाटा घेऊन उतरत्या क्रमाने टक्केवारीच्या उतरत्या प्रमाणे लावून घेण्यात आले.त्यानुसार १४ ग्रामपंचायत या अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या.



त्यापैकी सात ग्रामपंचायती ह्या महिला संवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या, त्यापैकी तीन ग्रामपंचायती नजीकच्या काळात महिला घेण्यात आल्या उर्वरित चार ग्रामपंचायत चिठ्ठ्याद्वारे आरक्षित करण्यात आला. त्यानंतर अंबड तालुक्याकरता अनुसूचित जमाती यासवर्गाकरिता एकूण तीन जागा उपलब्ध होत्या. लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाप्रमाणे तीन ग्रामपंचायतीचे आरक्षण करण्यात आले व त्यापैकी दोन महिलांसाठी राखीव असल्याने एक चिठ्ठीद्वारे व एक मागील नजीकच्या काळातील आरक्षण पाहून आरक्षित करण्यात आले. त्यानंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग याकरिता अंबड तालुक्यासाठी एकूण ३० ग्रामपंचायती राखीव करण्यात आल्या आज रोजी पर्यंत एकदा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या एकूण ४२ ग्रामपंचायती होती त्या ४२ पैकी एक एसटी व दोन एस सी समोर करिता गेलेले असल्याने त्या वगळण्यात आल्या उर्वरित ३९ ग्रामपंचायती पैकी ३० ग्रामपंचायती चिठ्ठ्याद्वारे नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या. त्यापैकी १५ नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला या प्रवर्गासाठी चिठ्ठ्याद्वारे राखीव ठेवण्यात आले. त्यानंतर उर्वरित ६४ ग्रामपंचायती ह्या सर्वसाधारण करिता उपलब्ध झाल्या त्यापैकी ३२ या सर्वसाधारण महिला करता राखी काढण्यात आल्या त्यापैकी एक महिला राखीव हे चिठ्ठी द्वारे करण्यात आल्या व इतर ३१ ह्या नदीच्या काळात असलेल्या आरक्षणाचा विचार करून महिला या करता राखीव ठेवण्यात आल्या. उर्वरित ३२ ग्रामपंचायती ह्या सर्वसाधारण करिता उपलब्ध झाल्या सदर वेळी सर्व उपस्थित यांना तहसीलदार विजय चव्हाण यांनी सदर आरक्षण सोडत प्रक्रिया व कायदेशीर बाबी सर्वप्रथम समजावून सांगितले होते. आरक्षण सोडत दरम्यान अथवा त्यानंतर एकही लेखी अथवा तोंडी आक्षेप या कार्यास प्राप्त झालेले नाही. सदर वेळी नायब तहसीलदार महेंद्र गिरगे भागवत देशमुख व इतर कर्मचारी व तालुक्यातील नागरिक पत्रकार उपस्थित होते. अंबड तालुक्यातील आरक्षण सोडत ही प्रक्रिया अत्यंत खेळीमेळीच्या व शांततेत आरक्षण सोडत पार पडली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी याच संस्थेचा व्हि.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन) या ग्रंथास सन- २०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी द्वितीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या उपरोक्त संस्थेचा सलग हा चौथा पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाला आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.



उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनिय कारकिर्दीची दखल घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबत अकॅडमीचे सचिव प्रकाश घादगिने यांनी कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत डॉ.भालचंद्र ब्लड बँक, बसस्टँड मागे, लातूर येथे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे पहिले साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापुर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २१ हून अधिक पुस्तके, विविध वृत्तपत्र, नियतकालिकांतून लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे तिनशेहून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच परिवर्तन संशोधन मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. आगामी काळात ११ विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. या सर्व विषयांवरील त्यांच्या ग्रंथसंपदा प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन आदी विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७३५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १५/१०/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) पांडुरंग अंबादास कोरडे २) अनिता पांडुरंग कोरडे दोघे राहणार शिराढोण ता.अंबड जि.जालना सर्व्हे नं. ३५ (भाग) सहन प्लॉट नंबर १ सिटी सर्व्हे नंबर १८६६/१ न.प.मि.न.१८-१२३-०१ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२३-१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १२ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : सर्वे नं.३५ चा भाग
दक्षिण-याच प्लॉटमधील कुसूम सिताराम भालेकर व नकुल सिताराम भालेकर यांचा प्लॉट
उत्तर - सर्वे नं.३५ चा भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

पान ६ वरून...

### अंबाजोगाई तालुका भाजपा

सुनिल सिरसाट हे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या अंबाजोगाई तालुका उपाध्यक्ष आणि सरचिटणीस पदी उल्लेखनीय कामगिरी केलेले, त्यांच्या काळात अंबाजोगाई शहरासह ग्रामीण भागात एकाच वेळी ५१/५२ भाजपा शाखांची ओपनिंग केलेले युवा नेते आहेत.

मुस्लीम-दलित समाजातील काम तर उल्लेखनीयच

अंबाजोगाईच्या आणि भाजपच्या ईतिहासात मुस्लिम आणि दलित समाजात दखल घेण्याइतपत पक्ष आणि कार्यकर्ते वाढवण्याचे उल्लेखनीय काम सुनिल सिरसाट यांनी केलेले आहे. भाजपाच्या सभांना आणि बुथवरती बुथ प्रमुख हे स्व.सुनिलकाका लोमटे आणि सुनिल सिरसाट यांच्या काळातच पहिल्यांदा पाहावयास मिळाले. अंबाजोगाईतील सर्वमान्य मुस्लिम सुफी संत घराण्यातील तिन्ही सुफी बाबांचे कौटुंबिक सदस्य म्हणूनही सुनिल सिरसाट सर्वपरिचित आहेत.तेंव्हा प्रत्येक अंगाने परिपक्व असणारे अत्यंत जुने कट्टर समर्थक आणि कार्यकर्ते व एक खुंखार पत्रकार असणारे सुनिलभाऊ सिरसाट हेच आज अंबाजोगाई भारतीय जनता पार्टी च्या तालुका अध्यक्ष पदी योग्य राहतील. स्व.मुंडे साहेबांनाही या निवडीचा आनंद होईल. तेंव्हा अंबाजोगाई शहरातील आणि तालुक्यातील भाजपाच्या जुन्या नव्या कार्यकर्त्यांची आणि पदाधिकार्यांची पाहिजे तशी सांगड घालून परत भाजपाला १५-२० वर्षांपूर्वीचे वैभव मिळवून देण्यासाठी नामदार पंकजाताई, मा.खा.डॉ.प्रितमताई मुंडे, आमदार नमिता ताई यांनी विचाराअंती सुनिलभाऊ सिरसाट यांचीच भाजपाचे तालुकाध्यक्ष पदी निवड करावी ही अनेकांच्या मागणीनुसार आमची पक्षनेतृत्वाकडे विनंती.

### जिल्ह्याच्या सामाजिक

यशस्वी ठरताना दिसत आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन संतोष देशमुख यांचं एका शाळेला नाव देण्याचा निर्णय घेऊन सामाजिक सुलोख्याचा संदेश दिला आहे.

गेल्या अनेक महिन्यापासून बांगर कुटुंबीयांवर अनेक संकट आली आणि ती बांगर कुटुंबीयांनी खंबीरपणे पेलवली पण समाजामध्ये सुरू असलेला सामाजिक तेड कमी करण्यासाठी बांगर कुटुंबीय नेहमीच अग्रेसिव राहिले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आज स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन स्व.संतोष देशमुख यांचं शाळेला नाव देण्याचा निर्णय घेऊन सामाजिक सलोखा जपण्याचं महत्त्वाचं आणि पहिलं पाऊल उचल आहे. अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोख्याचं केंद्रबिंदू म्हणून बांगर कुटुंबीयांकडे पाहिलं जातं तीच परंपरा आज विजयसिंह बाळा बांगर यांनी कायम ठेवत स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांचे नाव शाळेला देण्याचं निर्णय घेऊन सामाजिक सलोख्याचा संदेश दिला आहे. मस्सजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन हा निर्णय जाहीर केला यावेळी विजयसिंह बाळा बांगर यांच्या समवेत सेवा सोसायटीचे संचालक-सय्यद सज्जाद, सचिन पवार यांच्यासह मस्साजोग गावातील ज्येष्ठ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता..

बांगर कुटुंबीयांच सामाजिक सलोख्यासाठी पहिल पाऊल!

बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोखा राहावा यासाठी नेहमीच महत्त्वाची भूमिका घेतली आहे. सध्याचे बीड जिल्ह्यातील वातावरण पाहून विजयसिंह बाळा बांगर यांनी युवकांची टीम तयार करून सामाजिक सलोख्यासाठी काम करणार असल्याचे देखील सांगितले आहे.

### भीमजयंती महोत्सवात

सर्व पदार्थांची विक्री झाली. नंतर यातील हरभरा चटपट स्टॉलला प्रथम , वडापाव स्टॉलला व्दितीय व ज्यूस स्टॉलला तृतीय क्रमांक देण्यात आला. त्या स्टॉलधारकांचे सन्मानपत्र व भारताचे संविधान देऊन सत्कार करण्यात आला. इतर स्टॉल धारकांचाही संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. आनंदनगरी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी चक्रवर्तीताई थोरात , सरस्वतीताई लांडगे , संजीवनीताई घाडगे , वंदनाताई जोगदंड , आरतीताई भटकर , सुमित्राताई पोटभरे , संघमित्राताई भिवगडे आदींनी विशेष प्रयत्न केले.

### वडवणी येथे आज होणाऱ्या

तथा शिंदेशाही घराण्याचे चिरंजीव उत्कर्ष आनंद शिंदे व त्यांचा संपूर्ण संचआज सायंकाळी ठीक ७ वा. वडवणी शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक याठिकाणी भव्य-दिव्य असा भीम गीताचा कार्यक्रम होणार आहे या माध्यमातून महाप्रबोधन तसेच डॉ . आंबेडकरांची महती व कार्यांचे देखील गायक उत्कर्ष शिंदे यांच्या वाणीतून ते सांगणार आहेत तर या भीम गीतांच्या जलसा कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते तथा जिल्हा परिषदेचे विद्यमान सभापती जयसिंगभैया सोळंके साहेब हे असणार आहेत. तर उत्कर्ष शिंदे यांच्या भीम गीतांच्या भव्य कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील व तमाम बीड जिल्ह्यातील आंबेडकरी समाजासह विचारवंत व बहुजन विचारसरणीच्या अनुयायांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे यांच्या सह कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांनी केले आहे.

### मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये

चि.अन्वय शिवशंकर शेरकर इयत्ता तिसरी - राज्यातून ३२ वा व जिल्ह्यातून २६ वा तसेच चि.नीरज नितीन गायकवाड इयत्ता - चौथी-राज्यातून ३० वा व जिल्ह्यातून २४ वा क्रमांक मिळवून मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये मेरिट लिस्टमध्ये येण्याचा मान यांनी मिळवला आहे. चौघांचेही संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. सुरेंद्रजी आलूरकर, संस्थेच्या उपाध्यक्षा मा.सौ.ज्योती भाभी ठाकूर,संस्थेचे कार्यवाह, मा.डॉ.श्री. हेमंतजी वैद्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री.व्यंकटेशजी गोसावी, कार्यवाह केदारजी मंत्री, शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री. श्रीपादजी जपे, मुख्याध्यापिका सौ.सुषमाताई , मूल्यमापन व स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख श्रीम.सुवर्णलता खानापूरकर तसेच सर्व शिक्षक वृंद सर्वांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

### न्यायाधीश ऋचा कुलकर्णी

अभ्यासाचे नियोजन कसे करावे, सध्याच्या काळात सोशल मीडियाला आपण दूर कसे ठेवावं, या सगळ्याचं महत्व पटवून दिलं तसेच विद्यार्थ्यांना हेही समजावून सांगितलं की मी मराठी माध्यमातून शिक्षण घेतलं आहे आणि अकरावी बारावी ही आर्ट्स ही शाखा निवडून हे यश प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित केलं पाहिजे इंग्रजी माध्यम किंवा मराठी माध्यम यामध्ये तुलना करू नका. इंग्रजी फक्त एक भाषा आहे त्याचा नॉलेज म्हणून उपयोग करू नका आपण मराठी भाषेतूनही आपल्याला हवं असलेलं यश खेचून आणू शकतो फक्त मनात जिद्द असली पाहिजे तरच आणि तरच हे साध्य होईल. याप्रसंगी कु. ऋचा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणांचा दाखला देखील दिला की, समाजात अशी अनेक लोक होऊन गेले आहेत ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण करून दाखवले आहे आणि तुम्हीही या पेक्षाही खूप मोठे यश संपादन करू शकाल.

अध्यक्षीय समारोप करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री कसबे सर यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले व आपल्या ध्येयाकडे योग्य वाटचाल करा असे आपल्या वक्तव्यातून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. करपे ए. एस. यांनी केले तर आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री हावळे सर यांनी मानले.

# पर्यावरणपूरक शेतीच शाश्वत शेतीचा आश्वासक स्रोत

## शेती मातीचे शाश्वत संवर्धन या विषयावरील चर्चासत्रात अभ्यासकांचे मत

पुणे : जमिनीची सुपीकता टिकवायची असल्यास जीव, जंतू, जिवाणूंचे संवर्धन महत्त्वाचे आहे. त्याकरिता माती, पाणी आणि पर्यावरणपूरक शेतीपद्धतीचा अंगीकार केला पाहिजे. हाच शाश्वत शेतीचा आश्वासक स्रोत असल्याचा सूर आयोजित गटचर्चासत्रात विविध तज्ज्ञांनी व्यक्त केला.

'शेती मातीचं शाश्वत संवर्धन' या विषयावर झालेल्या या चर्चासत्रात कॅन बायोसिसच्या व्यवस्थापकीय संचालिका संदीपा कानिटकर, नैसर्गिक शेतीचे अभ्यासक, पद्मश्री पुरस्कारप्राप्त सुभाष शर्मा, 'शून्य मशागत शेती' तंत्राचे प्रणेते प्रताप चिपळूणकर, देगाव (छत्रपती संभाजीनगर) येथील दीपक जोशी हे सहभागी झाले होते. लाल कंधारीच्या संवर्धनात योगदान देणारे मावल (लातूर) येथील शरद पाटील यांचा या वेळी ॲग्रोवनचे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी पद्मश्री पुरस्कारप्राप्त सुभाष शर्मा म्हणाले, ''१९९४ पासून मी नैसर्गिक शेतीत काम करतो आहे. मी त्या आधी त्याचा अभ्यास केला, अनुभव घेतला, तेव्हा पर्यावरणपूरक शेतीतूनच शाश्वत शेतीचे मॉडेल विकसित होईल, हे माझ्या लक्षात आले आणि आतापर्यंतची वाटचाल केली. सध्या वातावरणातील बदलाचे मोठे आव्हान आहे. त्यामुळे सध्याच्या शेती पद्धतीत बदलाची गरज असून, हा बदल साधाण्यासाठी आपल्याकडे केवळ सात वर्षांचा कालावधी आहे. तोवर आपण भानावर येत बदल स्वीकारला नाही तर त्याचे दुष्परिणाम शेती व्यवस्थेला भोगावे लागतील. देशाचे ८० टक्के क्षेत्र डार्कझोनमध्ये आहे. पर्यावरणीय असंतुलन हा देखील शेती आणि समाजासमोरचा मोठा धोका आहे.



त्याकरिता शेतातच पाण्याचा थेंब अन्? थेंब जिरविण्यावर भर दिला पाहिजे. नैसर्गिक शेती पद्धतीत गुणवत्ता, संख्या आणि बाजारपेठ (क्वालिटी, क्वान्टिटी, मार्केट) या बाबी महत्त्वाच्या ठरतात. या बाबींवर लक्ष देत विक्री व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. गुणवत्ता असल्यामुळे मागणी अधिक आणि पुरवठा कमी अशी स्थिती निर्माण झाली. यामुळे चांगला दर मिळविता आल्याचे त्यांनी सांगितले.

कॅन बायोसिसच्या व्यवस्थापकीय संचालिका संदीपा कानिटकर म्हणाल्या, की द्रवरूप जैविक खताच्या संशोधनाकरिता १९९७ मध्ये पहिले पेटंट आम्हाला मिळाले. आता लवकरच आमची उत्पादने २७ देशात पोहोचणार आहेत. शेतीतल्या ३० टक्के निविष्ठा या जैविक, नैसर्गिक आहेत. हे मोठे परिवर्तन आहे. कार्बन व्यवस्थापन हे गुंतागुंतीचे वाटत असले, ते फार सोपे आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी हे तंत्र आधी समजून घेतले पाहिजे.

काटेकोर शेतीकडे वाटचाल करताना माती व्यवस्थापन हाच पहिल्या टप्पा महत्त्वाचा आहे, असेही कानिटकर यांनी सांगितले. प्रताप चिपळूणकर म्हणाले, ''१९७० मध्ये कृषी पदवीधर झाल्यानंतर शेतीला सुरुवात केली. सुरुवातीची पंधरा-वीस वर्षे उत्पादन चांगले मिळाले, तरी पुढे उत्पादकता घटली. यामागील कारणांचा शोध घेताना भू सूक्ष्मजीवशास्त्र या विषयाकडे वळलो. सूक्ष्मजीव आवश्यक आहेत, त्यांना आहार म्हणून सेंद्रिय कर्बाची पातळी संतुलित ठेवली पाहिजे हे समजले. शेणखत टाकणे, पाचट कुजविण्यासारख्या उपक्रमातून फारसे काही हाती येत नसल्याचे समजले. म्हणजेच या प्रयोगातून जितकी सुपीकता आणि उत्पादकता वाढायला हवी, तितकी वाढली नव्हती. याला पर्याय शोधू लागलो. मग सेंद्रिय कर्ब अधिक कोणत्या घटकांतून वाढेल, यावर विचार सुरू झाला.

मग जमिनीखालील व सावकाश कुजणाऱ्या उसाची खोडकी, मुळाचे जाळे यातून सेंद्रिय कर्ब अधिक वाढतो हे समजले. हे घटक तर आपण जमिनीच्या बाहेर काढत होते. त्याला जागेवरच कुजविण्याला प्राधान्य दिले. त्यानुसार भातशेती विना नांगरणी करण्याचा निर्णय घेतला. त्याचे सकारात्मक परिणाम समोर आले. येथूनच शून्य मशागत तंत्रज्ञानाचा जन्म झाला. या तंत्रात उत्पादकता वाढच नाही, तर उत्पादित शेतीमालाचा दर्जाही वाढत असल्याचे माझे निरीक्षण आहे. या तंत्रात उत्पादकता खर्च खूपच कमी राहतो. शेती शाश्वत होईल, असे त्यांनी सांगितले.

दीपक जोशी म्हणाले, ''तणे म्हणजे शत्रू या भूमिकेतून बाहेर पडायलाच वेळ लागला. मग नियंत्रणाकडून तण व्यवस्थापनाकडे वळलो. शून्य मशागत तंत्रातूनच कोरडवाहू शेतीला स्थिरता मिळू शकेल, हे लक्षात आले. तणे असली की किडी फारशा मुख्य पिकांकडे वळत नाहीत, हे गावातील दोन, तीन प्रसंगातून लक्षात आले. यातूनच पिकाला सहजीवाची गरज अधोरेखित झाली.

## विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना टेक्स्टटाईल पार्कचा फायदा - मुख्यमंत्री फडणवीस

वर्धा : कापसापासून कापडापर्यंत आणि कापडापासून फॅशनपर्यंत सगळ्याप्रकारचे इंटीग्रेशन अमरावतीमध्ये होणार आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना टेक्स्टटाईल पार्कमुळे होणार आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. अमरावती येथील विमानतळाचे उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बुधवारी (दि.१६) बोलत होते.

यावेळी केंद्रीय वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. फडणवीस पुढे म्हणाले, ''मागच्या सरकारच्या काळात टेक्स्टटाईल हब अमरावतीमध्ये सुरू केलं. त्यामुळे आता अमरावतीमधील एमआयडीमधील जवळजवळ सर्व प्लॉट संपले. तिथे औद्योगीकरण वाढलं. पीएम मोदींनी टेक्स्टाईल मित्राचा पार्क अमरावतीमध्ये दिला आहे. २ लाख रोजगार त्यातून उपलब्ध झाला आहे.'' असंही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी विदर्भाच्या सिंचन प्रश्न कायमचा संपणार आहे, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केला. ते म्हणाले, ''वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हाती घेतला आहे. विशेषत; पश्चिम विदर्भाचे पाच जिल्हे आणि पूर्व विदर्भातील दोन असे एकूण सात जिल्ह्यांचा चेहरामोहरा बदलणार आहे. त्यातून दहा लाख एकर जमीन पाण्याखाली येणार आहे. या प्रकल्पाचं बाबी अंतिम चरणात आहेत. या प्रकल्पा विदर्भ कायमचा दुष्काळमुक्त होणार आहे. तसेच कोरडवाहू क्षेत्र हा विषय विदर्भातील संपेल'' असा



विश्वासही फडणवीसांनी व्यक्त केला. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा विदर्भातील अमरावती विभागात झाल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी अमरावतीसोबत अकोला विमानतळ, यवतमाळ विमानतळ विस्तारीकरणावर भाष्य केलं. उद्योजक विमानतळ पाहता आणि मग ज्या ठिकाणी विमानतळ असेल तिथे गुंतवणूक करतात, असंही फडणवीस म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विमानतळामुळे विदर्भाच्या ग्रामीण भागाचा विकास होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मित्रा टेक्स्टटाईल पार्क, वस्त्रोउद्योग धोरण तसेच संत्र्यावरील प्रक्रिया उद्योगामुळे विदर्भाचा विकास होईल, असंही अजित पवार म्हणाले.

## खोडवा ऊस-कमी मेहनत, जलद वाढ, अधिक उत्पादन

ऊस उत्पादनासाठी लागणारे श्रम आणि खर्च यामुळे शेतकऱ्यांसाठी विविध आव्हाने निर्माण होतात. यामध्ये खोडवा ऊस पिकाची लागवड एक महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. खोडवा ऊस पिकाची लागवड ही पारंपरिक ऊस लागवडीपेक्षा अधिक फायदेशीर ठरते,



पूर्व मशागतीवरील खर्चाची बचत : खोडवा ऊस पिकाची लागवड करण्यासाठी पूर्व मशागत करणे आवश्यक नसते. पारंपरिक ऊस लागवडीमध्ये जमिनीत पूर्व मशागतीसाठी वेळ आणि खर्च लागतो, परंतु खोडवा पिकात हे सर्व खर्च वाचतात. यामुळे शेतकऱ्यांचा हेक्टरी खर्च कमी होतो, ज्यामुळे आर्थिक बचत होते.

वेळ आणि श्रमाची बचत : या पिकाच्या लागवडीसाठी कमी वेळ आणि श्रम लागतात, ज्यामुळे शेतकऱ्यांची अतिरिक्त वेळ आणि ऊर्जा बचत होऊ शकते.

पुन्हा लागवडीवरील खर्चात बचत : खोडवा पिकामुळे, शेतकऱ्यांना बेणे, बीजप्रक्रिया आणि ऊस लागवडीसाठी लागणारे इतर खर्च कमी होतात. साधारणपणे, या पिकामुळे प्रति हेक्टरी ४०,००० ते ४२,००० रुपये पर्यंतची बचत होऊ शकते. यामुळे शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर पर्याय मिळतो.

जलद वाढ आणि लवकर तयार होणे : लागणीच्या ऊसाला तोडल्यानन्तर खोडव्यास लगेच पाणी दिल्यास त्याच्या बुडख्यांचे डोळे लवकर फुटतात, आणि त्याची वाढ लवकर सुरू होते. यामुळे, उसाचे खोडवा पीक पारंपरिक पिकापेक्षा एक ते दीड महिना लवकर तयार होऊ शकते. यामुळे शेतकऱ्यांना जलद उत्पादन मिळते.

साध्या व्यवस्थापनातून जास्त उत्पादन : खोडवा पिकाच्या व्यवस्थापनाची प्रक्रिया साधी असते, तरीही या पिकातून लागणीच्या पिकापेक्षा अधिक उत्पादन मिळवता येते. कमी व्यवस्थापनात अधिक उत्पादन हा खोडवा पिकाचा एक मोठा फायदा आहे, जो शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

जास्त ऊसाचे उत्पादन : खोडवा पिकामध्ये जमिनीतील बुडख्यांवर अधिक डोळे असतात, ज्यामुळे उसाची संख्या पारंपरिक ऊसापेक्षा जास्त होते. यामुळे अधिक उसाचे उत्पादन होऊ शकते, जे शेतकऱ्यांच्या उत्पन्नासाठी फायद्याचे ठरते.पाणी आणि ओलीचे संरक्षण : खोडवा पिकाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते जास्त पाणी आणि ओलीचे संरक्षण सहन करू शकते. पाणी कमी असतानाही हे पीक चांगले वाढते, आणि त्यामुळे त्यात उत्पादनावर कोणतीही अडचण येत नाही. या पिकात तणांचे नियंत्रण देखील योग्य प्रकारे केले जाते.

सेंद्रिय कर्ब वाढवणे : खोडवा पिकामध्ये पाचटाचा पूर्ण वापर करता येतो. या प्रक्रियेमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो, जे पुढे जाऊन जमिनीची उत्पादनक्षमता वाढवण्यास मदत करते. यामुळे शेतकऱ्यांच्या पर्यावरणीय पद्धतीतही सुधारणा होऊ शकते. खोडवा ऊस पिकाची लागवड पारंपरिक ऊस पिकाच्या तुलनेत अधिक फायदेशीर ठरू शकते. या पिकात कमी खर्च, कमी श्रम, जलद उत्पादन, अधिक ऊस आणि पर्यावरणीय फायदे यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मदत होते. जर शेतकऱ्यांनी याला योग्य प्रकारे लागवड केली, तर ते त्यांचे उत्पादन आणि नफा मोठ्या प्रमाणात वाढवू शकतात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक वसुंधरा दिन

#### महत्वाच्या घटना

१०५६ : क्रॅब नेब्यूलामधील (तेजोमेघ) सुपरनोव्हाचा महास्फोट
१५०० : पोर्तुगाल नाविक पेड्रो अल्व्येर कैब्राल यांनी ब्राझील देशाचा शोध लावला.
१९१५ : पहिल्या विश्वयुद्धा दरम्यान जर्मन सेनांनी पहिल्याचा विषारी वायूचा वापर केला.
१९२१ : नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी प्रशासकीय सेवेतून आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९४८ : अरब-इस्त्रायल युद्ध अरबांनी इस्त्रायलचे हैफा हे प्रमुख बंदर काबीज केले.
१९७० : पृथ्वी दिन पहिल्यांदा साजरा करण्यात आला.
१९७७ : टेलिफोन वाहतूक सुरू करण्यासाठी प्रथम ऑप्टिकल फाइबरचा वापर केला गेला.
१९७९ : आचार्य विनोबा भावे यांनी संपूर्ण गोहत्या बंदीच्या मागणीसाठी उपोषण सुरु केले.
१९९७ : राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. कल्याण बॅनर्जी यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील 'ओमप्रकाश भसीन पुरस्कार' जाहीर
२००६ : प्रवीण महाजन यांनी भाजपचे नेते प्रमोद महाजन यांच्यावर कौटुंबिक वादातुन गोळ्या झाडल्या.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९८ : वैशाख व. ७, शके १६२० शिवदिननाथ नाथपरंपरेतील एका शाखेचे प्रमुख सत्पुरुष (मृत्यू: )
१७२४ : एमॅन्युएल कांट जर्मन तत्त्ववेत्ता (मृत्यू: १२ फेब्रुवारी १८०४)
१७६० : मुघल शासक शाहाआलम यांचे द्वितीय पुत्र व भारतातील शेवटचे मुघल शासक बहादूर शहा द्वितीय यांचा जन्मदिन.
१८१२ : लॉर्ड जेम्स ॲन्ड्र्यू ब्राउन रॅमसे डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल (१८४८-१८५६), त्यांनी सार्वजनिक बांधकाम खाते स्थापन करुन सुमारे ३,४०० किमी लांबीचे रस्ते केले. टपाल व तार यांची सेवा सुरू केली. मुंबई ते ठाणे हा लोहमार्ग त्यांच्याच कारकीर्दीत सुरू झाला. (मृत्यू: १९ डिसेंबर १८६०)
१८७० : व्लादिमीर लेनिन रशियन क्रांतिकारक (मृत्यू: २१ जानेवारी १९२४)
१९०४ : जे. रॉबर्ट ओपेनहायमर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अणूबॉम्बचे जनक (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९६७)
१९१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बलदेव राज चोपडा यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००८)
१९१६ : यहुदी मेन्युहीन व्हायोलिनवादक व वाद्यवृंदसंचालक (मृत्यू: १२ मार्च १९९९)
१९१६ : काननदेवी अभिनेत्री व गायिका (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९२९ : प्रा. अशोक केळकर विख्यात भाषाशास्त्रज्ञ व साहित्य समीक्षक
१९२९ : उषा मराठे खेर ऊर्फ 'उषा किरण' शंभराहून अधिक चित्रपटात व रंगभूमीवर अभिनेत्री, मुंबईच्या नगरपाल (मृत्यू: ९ मार्च २००० नाशिक)
१९३५ : भारतीय-अमेरिकन गणितज्ञ आणि शैक्षणिक भामा श्रीनिवासन यांचा जन्म.
१९४५ : भारतीय प्रशासकीय अधिकारी आणि राजकारणी गोपाळकृष्ण गांधी यांचा जन्म.
१९७४ : प्रख्यात इंग्रजी कादंबरीकार व लेखक चेतन भगत यांचा जन्मदिन.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१६ : भारतीय पंजाबी भाषेचे नाटककार, नाट्य दिग्दर्शक, कादंबरीकार आणि लघुकथा लेखक व शिक्षणतज्ञ बलवंत गार्गी यांचे निधन.
१९३३ : रोल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक हेन्री रॉयस यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १८६३)
१९८० : फ्रिट्झ स्ट्रासमान जर्मन भौतिकशात्रज्ञ (जन्म: २२ फेब्रुवारी १९०२)
१९९४ : आचार्य सुशीलमुनी महाराज थोर विचारवंत, द्रष्टे समाजसुधारक आणि पुरोगामी सेवाव्रती जैन आचार्य (जन्म:)
१९९४ : रिचर्ड निक्सन अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ९ जानेवारी १९१३)
२००३ : बळवंत गार्गी पंजाबी नाटककार, दिग्दर्शक, कादंबरीकार व लघुकथाकार, पंजाब विद्यापीठातील भारतीय रंगभूमी विभागाचे प्रमुख, 'थिएटर ऑफ इंडिया' आणि 'फोक थिएटर ऑफ इंडिया' या पुस्तकांचे लेखक (जन्म: ४ डिसेंबर १९१६ भटिंडा, पंजाब)
२०१३ : लालगुडी जयरामन व्हायोलिनवादक, संगीतकार व गायक (जन्म: १७ सप्टेंबर १९३०)
२०१३ : जगदीश शरण वर्मा भारताचे २७ वे सरन्यायाधीश (जन्म: १८ जानेवारी १९३३)

## तिप्पट उत्पन्न देणाऱ्या जपानी रेड डायमंड पेरुची 'अशी' करा शेती

रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी जनापी डायमंड या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

योग्य हवामान आणि माती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसऱ्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकर्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.



# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका रस्त्याच्या दरम्यान यु टर्नच नाही

## समोर कार्यालय असून किलोमीटरचा वळसा: दुभाजक ओलांडण्याची शर्यत लक्ष्यवेधी आंदोलन






बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील २ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात असुन सध्या दुभाजक उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एक किलोमीटर अंतराच्या पल्ल्यात दोन्ही बाजूंनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, सामाजिक न्याय भवन, तहसील,असे २५ हुन अधिक शासकीय कार्यालये आहेत.सदरील मार्ग वर्दळीचा असल्याने ठिकठिकाणी वाहनांना वळण घेण्यासाठी यु टर्न आवश्यक आहे.मात्र छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग राजेंद्र भोपळे यांनी तांत्रिक नियमांकडे बोट दाखवून मनमानी कारभार करत शासकीय कार्यालयात येणाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे.

यु टर्न नसल्याने नागरीकांना समोर कार्यालय असुनही किलोमीटरचा वळसा मारावा लागणार आहे.स्वत:चे दुचाकी किंवा चारचाकी वाहन असणाऱ्यांना हा फेरा असला तरी सामान्य नागरिकांना रिक्षातुन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसील, जिल्हा सत्र न्यायालय याठिकाणी पुर्वीप्रमाणेच दुभाजकांमध्ये यु टर्न ठेवावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२१ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''दुभाजक ओलांडण्याची शर्यत'' लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, मुबीन शेख, सुदाम तांदळे,मुस्ताक शेख, बाजीराव ढाकणे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष आप सादिक इनामदार,आदींनी सहभाग घेतला.

दक्षिण बाजू : जिल्हा आरोग्य परीक्षण केंद्र ,शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ ,बाल संरक्षण अधिकारी कार्यालय, चंपावती क्रीडा मंडळ जिल्हा क्षयरोग कार्यालय, जिल्हा परिषद कन्या शाळा,माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय ,जिल्हा व सत्र न्यायालय, तालुका न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, जिल्हा जात पडताळणी कार्यालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ ,संत रोहिदास चर्मकार महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, दिव्यांग कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय, सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ ,सार्वजनिक बांधकाम कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय ,जिल्हा पुरवठा विभाग ,जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय ,नोंदणी निबंध कार्यालय ,जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने बीड ते अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटरचे काम २ वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे.

मार्गावरील खडी,धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होत आहे.कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरीकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघाताला निमंत्रण मिळत आहे. सामाजिक संघटना,नागरीकांच्या तक्रारी नंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेऊन या कामाची पाहणी करून महामार्ग प्राधिकरण आधिका-यांना पत्र देऊन संबंधित कंत्राटदारास १ कोटीचा दंड ठोठावला आहे.

सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नगरनाका,बालेपीर याठिकाणी खड्डे खोदून ठेवलेले असुन काम आजही अपुर्ण असुन संथगतीने काम सुरू असुन कंत्राटदाराच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

## थोडक्यात




### डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ पाणपोई

परळी। प्रतिनिधी

शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या शुभहस्ते संपन्न यावेळी सारड गावचे माजी सरपंच आघाव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात. पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना अँड.मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे. यावेळी मंगलवार मल्टीस्टेट बँकेचे शाखा अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी , शिवा बडे, बालासाहेब चाटे,प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### साक्षीताई करडकर यांच्या भागवत कथेचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वैतागवाडी, विजय नगर येथे वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह वैशाख शु १ दिनांक २८/४/२५सोमवार पासून प्रारंभ होत आहे. या नाम सप्ताहात काकडा भजन ,गाथा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ तसेच दुपारी २ ते ५ या वेळेत ह भ प भागवत कथा प्रवक्त्या साक्षीताई करडकर आळंदी देवाची यांची सु मधुर भागवत कथा आयोजित केली आहे .याबरोबरच या नाम सप्ताहामध्ये ह भ प गणेश महाराज अस्वले, ह भ प सुरेश महाराज जाधव, ह भ प अच्युत महाराज घोडके, ह भ प अक्षय महाराज पिंगळे,



ह भ प अनंत महाराज शिंदे, ह भ प अविनाश महाराज भारती, ह भ प सत्यवान महाराज लाटे यांचे हरी किर्तन सेवा होणार असून ५/५/२५सोमवारी ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे बाबा मठाधिपती नेकनूर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होणार आहे .या नाम सप्ताहात आळंदी देवाची येथील भागवत कथाकर साक्षीताई तुकाराम करडकर यांच्या भागवत कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे या भागवत कथेल तबला साथ योगेश महाराज जोगदंड, शिंथ वादन तुकाराम महाराज करडकर, पॅड रवी चीवडे हिंगोली, गायन पांडुरंग शिंदे यांची आहे या सर्व नाम सप्ताहातील कार्यकर्माचा व श्रवण भक्ती चा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरीमंडळी व भजनी मंडळ वैतागवाडी, विजय नगर यांनी केले आहे

### घराघरात महापुरुष जन्मले पाहिजेत -प्रा.वसंत ओगले

बीड। प्रतिनिधी

भैय्यासाहेब मोरे मित्र मंडळ व धानोरा रोड बीडच्या वतीने



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीच्या आयोजन दि. १४ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आलेले होते ,या जयंती सोहळ्यास प्रा.वसंत ओगले सर, यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की घराघरातून महापुरुष जन्माला आले पाहिजेत तरच सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक लढाई यशस्वी आणि चिरंतन टिकेल.याप्रसंगी माननीय राम चांदणे ,सर, निळू भाऊ सावरगेकर ,सुप्रीडेंट ऑफ लँड रेकॉर्ड शिंदे साहेब ,माननीय नगरसेवक रणजीत बनसोडे ,कवी निर्मळ, शेळके सर, आदमने साहेब, आदींनी आपले विचार मांडले, भिवाजी जोगदंड ,राजेंद्र गालफडे सर, रमेश तुपसुंदर, लांडगे व भैय्यासाहेब मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते व धानोरा रोडवरील समस्त नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब मोरे यांनी केले तर भैय्यासाहेब मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. राजेंद्र गालफडे सर यांनी सर्वांचे आभार मानले.

### जाहीर प्रगटन

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६९०/२०२५**

**महेश पि. आसाराम थापडे विरूध्द निरंक**

अर्जदार : १. महेश पि. आसाराम थापडे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. ढेकणमोहा, ता.जि. बीड. विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत आसाराम नानाभाऊ थापडे, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत आसाराम नानाभाऊ थापडे, यांचा मृत्यु दिनांक २२/०७/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर बारस नाहीत. मयत आसाराम नानाभाऊ थापडे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत आसाराम नानाभाऊ थापडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २१/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०६/२०२५ आहे.**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### युग प्रवर्तक चषक स्पर्धेत क्वालिटी स्पोर्ट्स क्लब संघ उप विजेता

माजलगाव। प्रतिनिधी




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने युगप्रवर्तक चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येत असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी क्रिकेटपटू शिक्षक व इतर कर्मचारी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते.या साखळी सामन्यात एकही मॅच न हरता सहभागी सुंदरराव सोळंके महाविद्यालय संघ, ईगल वूड,पोलीस इलेव्हन,आय के एन व एफ जी एस या संघांना नमवून लीग मॅचेस च्या पॉईंट टेबल वर प्रथम क्रमांक असणारा मानकरी क्वालिटी स्पोर्ट क्लब संघ ठरला. तरी या संघावर सर्व स्तरातील क्रीडा प्रेमींकडून शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

गेली अकरा वर्षापासून सलग युग प्रवर्तक चषक हे यशस्वीरित्या आयोजन करण्यात येते.युगप्रवर्तक चषक बक्षीस वितरण समारंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका माजलगाव या ठिकाणी पार पडले असता.या कार्यक्रमाची सुरुवात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून राहुल सुर्यतळ (पोलीस निरीक्षक शहर पोलीस स्टेशन माजलगाव ), माकणे (पी आय शहर पोलीस स्टेशन माजलगाव), इम्रान नाईक ( युवा उद्योजक ),रमेश फपाळ,प्रशांत तौर,विलास शेजुळ,शेख सलीम (युवक जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी),नारायण कचरे,अशोक लांडगे (ता.अ. राष्ट्रवादी शि. संघटना) उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार व सर्व उपस्थित मान्यवर यामध्ये प्रभाकर साळवे, अमोल राऊत, प्रमोद साळवे, लक्ष्मण सरवदे,माणिक राठोड, अबूबकर, सिद्दिकी, बाबा जाधव, तोकलवाड,सुहास बोराडे,अबू शेरा, अभिमन्यू इबिते, वसंत टाकणखार, रवी आदमाने यांच्या सह विविध संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक नेते, वरीष्ठ शिक्षक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारत टाकणखार यांनी केले.तर सूत्रसंचालन निलेश गावडे यांनी केले.याप्रसंगी सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

### ब्रह्माकुमारीज केंद्राच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित रहा-अनितादिदी

माजलगाव। प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नवीन 'प्रभू दर्शन भवन' वास्तूचे लोकार्पण सोहळा दि.२२ एप्रिल मंगळवार रोजी संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी ब्रह्माकुमारी मुख्य ठिकाण माउंट आबू येथील राजयोगिनी उषा दीदीजी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या तसेच मा.आ. श्री.प्रकाशदादा सोळंके आमदार माजलगाव, तसेच प्रमुख पाहुणे मा. श्री. मोहनराव काका सोळंके, माजी आमदार माजलगाव, राजयोगिनी सोमप्रभा दीदीजी संचालिका उपक्षेत्र सोलापूर यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी सेंटरचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. याकरिता पत्रकार परिषद घेण्यात आली.

यामध्ये आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताण-तणाव, नैराश्य,भय, दुःख, अशांती कशी कमी करता येईल तसेच व्यसनमुक्त करणे, डिप्रेशनमुळे होणाऱ्या आत्महत्या पासून



रोखणे, योग्य मार्गदर्शन करणे हे सर्व कार्य विनामूल्य ईश्वराचे ज्ञान मिळवण्यासाठी ब्रह्माकुमारीद्वारे 'राजयोग मेडिटेशन' विनामूल्य शिकवल्या जाते. माजलगाव शहरांमध्ये 'प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे' नवीन वास्तू सेवाकेंद्र ''प्रभू दर्शन भवन'' उद्घाटन करण्यात येत आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये माजलगाव सेवा केंद्र संचालिका अनिता दीदी, बीड सेवा केंद्र संचालिका प्रज्ञादीदी यांनी दिली. पत्रकार परिषदेच्या शेवटी सर्व पत्रकार बांधवांना कुरूडवाडी सेवा केंद्र संचालिका, गोदावरीदीदी यांनी मेडिटेशनचा अनुभव करून घेतला. शेवटी उपस्थित पत्रकार व बंधू-भगिनींचे आभार शिलादीदी यांनी मानले.

### अॅड. गणेश मोरे यांना महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सरपंच मा. अॅड. गणेश आसाराम मोरे यांनी गावातील विविध विकास कामे केले आहेत. आदर्श सरपंच म्हणून त्यांची परिसरात ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारा हा गणेश सतत लोकांच्या सेवेत असतो.

अॅड . गणेश मोरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्य करण्याची आवड असून ते नेहमीच समाजकार्यासाठी अग्रस्थानी असतात. गावचे प्रथम नागरिक म्हणून ते उत्तमपणे आपले कार्य करत असल्याने ग्रामस्थ त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिगजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. अॅड . गणेश मोरे यांची सरपंच पदाची दुसरी टर्म असून जनतेतील सरपंच पदाच्या पहिल्या निवडणुकीमध्ये गणेश मोरे बीड जिल्ह्यातील कमी वयात पहिल्या वेळेस जनतेतून सरपंच झालेला मुलगा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. आता सध्या त्यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या सरपंच आहेत. गणेश मोरे यांची ओळख मेटे साहेबांचा कार्यकर्ता म्हणून निर्माण झालेली आहे. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे गणेश मोरे यांचे अभिनंदन आणि कौतुक परिसरातून नव्हे तर बीड जिल्ह्यामधून होत आहे, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना पाहायला मिळत आहे. स्वच्छतेच्या उद्देशाने नाली बांधकाम, गटारी योजना, प्रवाहाप्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना राबवली, गावच्या स्वच्छतेच्या अनुषंगाने गावातील प्रत्येक घरासमोर शोषखड्डे नियोजन करण्यात आले आहे. गावामधील पाणी असेल ते त्याच ठिकाणी मुरून पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होते.

### आरोग्य सेवा हे देशसेवेच रुप, त्याची इंडस्ट्रीज होऊ देऊ नका: डॉ.ओमप्रकाश शेटे

माजलगाव । प्रतिनिधी

आरोग्याचं क्षेत्र हे देशसेवेच माध्यम आहे, त्याची इंडस्ट्रीज होऊ देऊ नका असे प्रतिपादन आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले.गुरुकृपा शिक्षण समुहाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवात 'सन्मान भूमिपुत्रांचा' कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.शिवरत्न शेटे,शिल्पा शेटे यांचाही सन्मान करण्यात आला. प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ.प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी, शिवाजी रांजवण, जयदत्त नरवडे, संतोष यादव, अरुण इंगळे, अशोक तिडके, भास्कर शिंदे, प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर,डॉ. यशवंत राजेभोसले आदींची यावेळी उपस्थिती होती.



यावेळी सन्मानाला उत्तर देताना ओमप्रकाश शेटे यांनी आयुष्यात पैशापेक्षा नैतिकतेला महत्व देत आलो म्हणून समाजासाठी काही करता आले. सामान्य रुग्णाप्रती असलेल्या तळमळीतून काम करत गेलो,कुटुंबाचे संस्कार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास यातून हे करता आले. आरोग्य सेवा म्हणजे देशसेवा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे असे सांगतानाच लवकरच या पेक्षाही मोठी जबाबदारी घेऊन ' मी पुन्हा येईल' असे सांगितले. आयुष्मान भारत मधील उपचारांचे पॅकेज लवकरच बदलण्यात येतील असा शब्दही त्यांनी दिला.डॉ. शिवरत्न शेटे यांनी शिवराय आणि बाबासाहेब यांच्यातील साम्यस्थळे सांगितली.यावेळी डॉ.प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी,डॉ. प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर यांची समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविकात डॉ. यशवंत राजेभोसले यांनी आयोजना मागची भूमिका मांडत नव्या जबाबदारी नंतर ओमप्रकाश शेटे यांचा मराठवाड्यातील पहिला सत्कार माजलगावात होत असल्याचा आनंद असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन अशोक वांडेकर यांनी केले तर आभार मनोज फरके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग उगले,कपिल डोंगरे, डॉ.रंगनाथ गोळकर,डॉ. युवराज कोल्हे, विकास लांडगे, अमित बिंदू आदींनी परिश्रम घेतले.

## अन्नदान करून साजरी केली हॅरिसन फ्रान्सिस रेड्डींची पुण्यतिथी

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते शेख निजाम यांनी एआयएमआयएम पक्षाचे दिवंगत जिल्हा प्रवक्ते हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांची चौथी पुण्यतिथी शहरातील बेघर निवारागृहात बेघरांना अन्नदान करून साजरी केली. यावेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रासह पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी हे समज आल्यापासून सामाजिक चळवळीत नेहमी सक्रीय असायचे. जे प्रश्न जनहिताचे आहेत ते प्रश्न उचलण्यांसाठी ते सदैव पुढे यायचे. शिवाय त्यांचे वक्तृत्व आणि भाषण करण्याची शैली ही सडेतोड, परखड आणि आक्रमक असायची.



त्यांची ही शैली बघून एआयएमआयएम पक्षाचे तत्कालीन बीड जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी त्यांना पक्षात घेतले होते. एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्यांनी रेड्डींना प्रथम पक्षाचे प्रवक्ते केले व नंतर मुख्य जिल्हा प्रवक्ते पद सुद्धा दिले होते. अशा प्रकारे निजाम यांनी त्यांना पक्षाचे मोठे व्यासपीठ मिळवून दिल्याने रेड्डींनी आपल्या बुलंद भाषणांनी प्रस्थापितांना सळो की पळो करून सोडले होते. निजाम यांचे जिल्हाध्यक्ष पद गेल्यानंतरही रेड्डी हे पक्षाचे मुख्य प्रवक्ते म्हणून मृत्यू पर्यंत कार्यरत होते. एका मोठ्या पक्षाचे मुख्य प्रवक्ते असूनही नेहमी पाय जमिनीवर ठेवून जगलेल्या रेड्डी सारख्या भल्या माणसाला त्यांच्या मृत्यूनंतरही शेख निजाम विसरले नाही. आपल्या या जुन्या सहकाऱ्याच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांनी दिनांक २० एप्रिल २०२५ रविवार रोजी संध्याकाळी शहराच्या भाजी मंडई परिसरातील बेघर निवारा केंद्रात बेघरांना अन्नदान करून हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांची पुण्यतिथी साजरी केली. यावेळी शेख निजाम, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, मोमीन जुबेर, सय्यद आजम, सायमन रेड्डी, वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते रहेमत पठाण, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे युवा नेते फारुक शेख, बेघर निवारागृह चे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़, बेघर निवारागृहातील महिला, पुरुष, वयोवृद्ध नागरिक तसेच राजकीय, सामाजिक क्षेत्रासह पोलीस अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. सर्व उपस्थितांनी हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांना मनोभावे श्रद्धांजली वाहिली.

# पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता सहकार मंत्र्यांना निवेदन

## सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल; तातडीने बोलावली बैठक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सहकारी साखर कारखाना तेलगाव च्या नवीन वास्तू उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री श्री बाबासाहेब पाटील हे दिनांक २१ एप्रिल सोमवार रोजी आले असता पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता सहकार मंत्र्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन चे संचालक ऍड. विंद्र कानडे यांनी सविस्तर निवेदन दिले यावर विचार नक्कीच करू असे आश्वासन सहकार मंत्र्यांनी दिले आहे.



महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था व फेडरेशन यांच्या कायद्यामध्ये आवश्यक तो बदल व्हावा वसुली कायदे यामध्ये देखील सुधारणा व्हावी कलम १०१,१५६, व विक्री अधिकारी यांच्या कायद्यामध्ये सुधारणा होऊन भक्कमपणे संस्थांना काम करता यावे तसेच संस्थेच्या गुंतवणुकी बाबत सुरक्षितता तसेच सभासदांच्या ठेवीना विमा संरक्षण मिळावे त्याचबरोबर योग्य कर्जदार सभासद निवडता यावा करिता सिबिल सारख्या कंपन्या संस्थांना जोडता याव्यात व सहकार समृद्ध होण्यासाठी आवश्यक त्या सर्व इतर बाबींच्या सुधारणा करण्यासंदर्भातले सखोल मागण्यांचा उल्लेख या निवेदनात करण्यात आला असुन प्रसंगी राज्याचे सहकार मंत्री यांनी देखील सहकारात्मक भूमिका घेऊन सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सरकार निश्चितच काम करेल असे आश्वासन दिले यावेळी आ. प्रकाश सोळंके , जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपजिल्हा निबंधक समृद्ध जाधव यांच्या समवेत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनाची तात्काळ दखल घेऊन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ फेडरेशनचे पदाधिकारी आणि मंत्रालयीन अधिकारी यांची दि. २३ एप्रिल रोजी बैठक बोलावली असल्याची माहिती फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी दिली.

# राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक



पाटोदा । प्रतिनिधी

बुधवार रोजी पाटोदा येथील शासकीय विश्रामगृह येथे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न झाली , यावेळी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमीटीचे सरचिटणीस मा. अमरजी खानापुरे साहेब हे बीड जिल्ह्याचे निरिक्षक म्हणुन उपस्थित होते, त्याच बरोबर कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष मा. राहुलजी सोनवणे साहेब, पाटोदा तालुकाध्यक्ष मा. राहुलजी जाधव साहेब यांचेसह पाटोदा तालुक्यातील कॉंग्रेस पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते, त्यावेळी बीड जिल्हा कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष मा. राहुलजी सोनवणे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते

तर प्रमुख पाहुणे अमरजी खानापुरे साहेब हे बीड जिल्ह्याचे निरिक्षक म्हणुन उपस्थित म्हणून प्रथम यांचा सत्कार करण्यात आले यावेळी राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी निवडीबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.लवकरच काग्रेस उच्च भरारी घेणार आहे.या देशाला काग्रेसशिवाय प्राय नाही

काग्रेस पक्षाला मानरा मोठा वर्ग आपण लवकरच नवीन पदाधिकारी निवडावे व लोकांपर्यंत पोहचवा असे यावेळी आदेश देण्यात आले.

यावेळी या बैठकीत मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्षपदी अब्दुल कादर मकराणी यांची निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. या बैठकीत ज्येष्ठ नेते बाळासाहेब ठोंबरे पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव कोकाटे ,अड .विशाल मस्के ,प्रा.दिलीप वाघमारे, नगरसेवक उमर चाऊस, पाटोदा सेवा सहकारी संस्थांचे संचालक राहुल नागरगोजे,सचिन सवासे, लक्ष्मण भाकरे, बंडू टेलर, मुन्ना पाटील, प्रताप जाधव, चंद्रशेखर साठे, मुन्नाभाई केबलवाले, सतिश लामजे, निळकंठ मस्के, अजिंक्य जाधव,सिध्देश्वर शिंदे,प्रताप जाधव, मारुती पवळ, महादेव तांबे,रवी सानप उपस्थित होते.यावेळी प्रास्ताविक तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी केले तर सुत्रसंचलन दिलीप वाघमारे यांनी केले आभार अड.विशाल मस्के यांनी मानले.



माजलगाव:-बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे बीड जिल्हा सरचिटणीस कचरु तात्या खळगे, सुधाकर देशमुख, जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के,पत्रकार कमलेश जब्रास व पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे

# अंबाजोगाई तालुका भाजपा अध्यक्ष म्हणून सुनिल सिरसाट यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची गरज

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहर असो की ग्रामीण भाग असे एक गाव, तांडा, वस्ती नाही की जिथे सुनिल सिरसाट यांना कुणी ओळखत नाही. शासन व प्रशासनातील कोणत्याही कामाला गेल्या ५:२५ वर्षांपासून सर्वांसाठी नेहमीच तत्पर असणारे सुनिल सिरसाट वरच्या सरकारी दवाखान्यात तर आरोग्यदुतच म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. गेल्या कित्येक वर्षात त्यांनी शहरासह तालुक्यातील अनेकांच्या पोलिस स्टेशनमध्ये अडकलेल्या गाड्या-ऑटो स्वतः पोलिस स्टेशनमध्ये येऊन सोडवलेले किती तरी दाखले आहेत. स्व.मुंडे साहेबांचा एक कट्टर कार्यकर्ता, भाजपाचा हाडामासाचा समर्थक, तत्कालीन भाजपावासी धनंजय मुंडे साहेबांचा तर गळ्यातील ताईत सहकारी कार्यकर्ता. अधिकारी वर्गासी आणि भाजपासह सर्वांसोबत अतिशय सलोख्याचे संबंध जपत एक कट्टर मुंडे



सैनिक म्हणून ओळख निर्माण केलेला युवा नेता म्हणूनही सुनिल सिरसाट सर्वोपरिचीत आहेत. सन २००३ मधे मुंडे साहेब मुख्यमंत्री व्हावेत म्हणून अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवी पासून परळीच्या वैद्यनाथापर्यंत त्यांनी घेतलेला दंडवत तर त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र भाजपात एक चर्चेचा विषय ठरला होता. अशा या हाडामासाच्या कार्यकर्त्याने पक्षासाठी आणि पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी, धर्मासाठी जेल सुद्धा भोगलेली आहे. अत्यंत निर्भीड/निडर कार्यकर्ता असणाऱ्या सिरसाट यांनी आपल्या वकृत्वशैलीच्या जोरावर आणि निर्भीड पत्रकारितेच्या जीवावर नोंद घेण्याइतपत दांडगा जनसंपर्क निर्माण केलेला आहे. शिवाय सर्वांचे परिचित असलेले ◀◀ पान ३ वर

# जिल्ह्याच्या सामाजिक सलोख्यासाठी बाळा बांगरचे पहिले पाऊल!

## स्व.देशमुख कुटुंबीयांची भेट घेऊन शाळेला नाव देण्याचा घेतला निर्णय!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोद्यातील बांगर कुटुंबीय म्हणजे सामाजिक सलोख्याचे केंद्रबिंदू म्हणून ओळखले जाते. संघर्षातून उदयाला आलेले बांगर कुटुंबीय सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे बांगर साहेब त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत विजयसिंह बाळा बांगर यांनी सुरू केलेली सामाजिक सलोख्याची चळवळ खऱ्या अर्थानं ◀◀ पान ३ वर




### रामकृष्ण बांगर यांचे नाव घेताच मस्साजोगचे ग्रामस्थ झाले भावुक!

सहकार क्षेत्रात काम करत असताना सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये काम केले आहे, त्यामुळे प्रत्येक गावात बांगर साहेबांना आदराने ओळखल जाते, आज बाळा बांगर यांनी मस्साजोग येथे देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली यावेळी ग्रामस्थांनी रामकृष्ण बांगर साहेबांचं नाव घेऊन जुन्या आठवणींना उजाळा देत भावुक झालेले पाहायला मिळाले.



परळी : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने गावातील हनुमंत बालासाहेब मुंडे, गौतम संभाजी रोडे, वैजनाथ सोमीनाथ बहीरे, सुरेश बालासाहेब मुंडे यांच्या मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये आर्थिक स्वरुपाची मदत करण्यात आली. यावेळी से.स.सो. चेअरमन मिनीनाथ दादा फड, रामहरी फड, कॉंग्रेस नेते प्रकाश मुंडे, बंडू मुंडे, माधवराव मुंडे, गुंडीबा फड, बंडू फड, ग्रा प. सदस्य प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, बाबासाहेब मुंडे, तौफिक कच्छी, महादेव मामा मुंडे, समाधान मुंडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# भीमजयंती महोत्सवात आयोजित आनंद नगरीने सर्वांचा आनंद व्दिगुणीत केला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संघर्षभूमी वरील १४ दिवशीय भीमजयंती महोत्सवात यावर्षी पहिल्यांदाच आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला अत्यंत उत्तम प्रतिसाद मिळाला. लहान-थोरांच्या सक्रिय सहभागामुळे व प्रतिसादामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. भीमजयंती महोत्सवातील या आनंद नगरीने सर्वांचाच आनंद व्दिगुणीत केला.



या उपक्रमाच्या सुरुवातीस सर्व स्टॉल धारकांच्या हस्ते तथागत बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करण्यात आले. नंतर या आनंद नगरीचे उदघाटन झाले असे जाहीर करण्यात आले. त्यानंतर विविध खाद्य पदार्थ विक्री स्टॉलची सुरुवात झाली. यात रेखाताई तरकसे व संविधान थोरात यांनी चटकदार हरभरा चाटचा स्टॉल लावला होता. सक्षम जोगदंड यांनी चिवडा स्टॉल लावला होता. रक्षित भटकर व स्वयंदिप भटकर यांनी ऑरेंज ज्यूसचा स्टॉल लावला होता. किरण लांडगे व किर्ती लांडगे यांनी वडापावचा स्टॉल लावला होता. सुरेखाताई पोपळघट यांनी चिवडा स्टॉल लावला होता. तर साकेती घाडगे हिने भज्यांना स्टॉल लावला होता. या सर्व चटकदार व रुचकर खाद्य पदार्थांच्या स्वादाचा सर्वांनी आस्वाद घेत आनंद लुटला. अवघ्या अर्ध्या तासात ◀◀ पान ३ वर

# न्यायाधीश ऋचा कुलकर्णी यांचे द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात करिअर मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

येथील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात सोमवार दिनांक २१ /४ /२०२५ रोजी इयत्ता दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन देण्यात आले.

नुकत्याच झालेल्या राज्य लोकसेवा आयोग तर्फे घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून प्रथम आलेल्या कु. ऋचा विठ्ठलराव कुलकर्णी यांचे मोलाचे करिअर मार्गदर्शन विद्यालयातील इयत्ता दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री कसबे सर, प्रमुख पाहुणे कु. ऋचा विठ्ठलराव कुलकर्णी मॅडम, उप मुख्याध्यापक लाहोटी सर, पर्यवेक्षक श्री हावळे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रास्ताविक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री लाहोटी सरांनी करताना विद्यार्थ्यांना आपलं करिअर कसे घडवलं पाहिजे, किशोरवयीन मुला-मुलींनी या वयात कोणत्याही सोशल मीडियाच्या आहारी न जाता आपल्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे व आपल्याला हवी असलेल्या शाखेची निवड करून आपले ध्येय निश्चित करावे हे किती आवश्यक आहे याची माहिती दिली.

याप्रसंगी कु. ऋचा कुलकर्णी व त्यांच्या आई सौ मनीषाताई कुलकर्णी या स्वतः विद्यालयात उपस्थित होत्या. कु. ऋचा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, ◀◀ पान ३ वर

# शौकत अन्वर पठाण यांची मानव विकास परिषदेच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

मानव विकास परिषद म्हणजे शोषित, श्रमिक, पोलिस कोठडीत मृत्यु, बेकायदेशीर अटक, शोषण, गुलामगिरी, दहशत, मागसवर्गीयांवर होणारा अन्याय त्याचप्रमाणे सरकारी कार्यालयाकडून होणारी पिळवणूक, मानवी हक्कांचे उलंघन, शासकीय अधिकाराचा गैरवापर, भांडवल शाहीकडुन पैशाच्या व सत्तेच्या जोरावर शासकीय यंत्रणेला स्वार्थासाठी होणारा वापर हे सर्व समुळनाश



करण्यासाठी तसेच सर्व सामान्यांचे संविधानिक मानवी हक्कांसाठी मानव विकास परिषद प्रयत्नशिल आहे. सामान्य जनतेला न्याय अधिकार मिळवून देणारा बुलंद हा आवाज असुन शौकत पठाण सारख्या सामाजिक कार्यकर्त्याच्या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. सामाजिक बांधिलकी, निस्वार्थ वृत्ती आणि प्रामाणिकपणा यामुळे मानव विकास परिषदला जनतेकडून प्रचंड समर्थन मिळत आहे शौकत पठाण यांची बीड जिल्हा सचिव पदावर दि. १७ एप्रिल २०२५ ते दि. १६ एप्रिल २०२६ या कालावधी करीता नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यावर आष्टी तालुक्यातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये दत्ताजी भालेच्या शिरपेचात मानाचा तुरा





अंबड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये मंथन या स्पर्धा परीक्षेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी चे एकूण ३७ विद्यार्थी बसले होते. त्यातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, यामध्ये चि. विक्रांत शरद माळोदे - इयत्ता दुसरी - राज्यातून १७ वा व जिल्ह्यातून १२ वा क्रमांक मिळवला आहे, तसेच चि. अर्पित दत्तात्रय गव्हाणे इयत्ता दुसरी - राज्यातून २१ वा व जिल्ह्यातून १६ वा, ◀◀ पान ३ वर

# वडवणी येथे आज होणाऱ्या उत्कर्ष शिंदे यांच्या भीम गीताच्या कार्यक्रमाला उपस्थित रहा -घाडगे

वडवणी । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आज वडवणी याठिकाणी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शिंदेशाही घराण्याचे सुप्रसिद्ध गायक, संगीतकार उत्कर्ष आनंद शिंदे यांचा



भीम गीतांचा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला वडवणी शहरासह पंचक्रोशीतील आणि तमाम जिल्ह्यातील भीमसैनिक, बहुजन विचारसरणीच्या अनुयायांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आव्हान जयंती उत्सव समितीच्या समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक, युवा नेते राहुल घाडगे यांनी केले आहे.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारत देशातील भीम गीताचे बादशहा, रचनाकार, संगीतकार आणि गायक म्हणून शिंदे घराण्याकडे पाहिले जाते. तर नुकतेच एक चमत्कार व्हावा, एक जादूच व्हावी, गगनातून यावं एक विमान... त्यातून उतराव... माझ्या भिमान... भिमान " हे भीम गीत अवघ्या महाराष्ट्रात सह इतर राज्यातही धुमाकूळ घालत आहे. या गीता सोबत ही इतरही भिमा गीत व मराठी गीत देखील सुप्रसिद्ध आहेत. याच भीम गीताचे गायक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# परिवार म्हणून एकत्र येणं ही महाराष्ट्राची परंपरा, शरद पवारांसोबतच्या बैठकीनंतर अजितदादा काय म्हणाले?

पुणे । प्रतिनिधी

कौटुंबिक कार्यक्रमात एकत्र येणं हा पवार कुटुंबाचा अंतर्गत प्रश्न आहे. परिवार म्हणून एकत्र येणं ही महाराष्ट्राची परंपरा असल्याचं अजित पवार म्हणाले. पुण्यातील वसंतदादा इन्स्टिट्युटच्या बैठकीत शरद पवार आणि अजित पवार पुन्हा एकत्र आले. या संस्थेचे शरद पवार हे संस्थापक असून आपण ट्रस्टी आहोत, त्यामुळे आपल्याला एकत्र यावं लागतं असंही अजित पवार म्हणाले.

एकीकडे मनसे आणि शिवसेनेच्या युतीची चर्चा सुरू असताना आता लक्ष वेधलं ते पवार काका-पुतण्याच्या जवळीकतेनं. शनिवारपासून शिवसेना आणि मनसेच्या युतीची चर्चा आहे. अशातच सोमवारी पुण्याच्या साखर संकुलाच्या बैठकीला शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले होते. महत्त्वाचं



म्हणजे ही बैठक झाल्यानंतर वसंतदादा इन्स्टिटच्यूटच्या काही मोजक्या अधिकाऱ्यांसह काका पुतण्याची वेगळी बैठक पार पडली. साखर संकुलात तब्बल अडीच तास काका पुतणे एकमेकांच्या शेजारी असल्याचं दिसून आलं. एकीकडे ठाकरेंच्या घरात युतीची चाहूल लागल्याची चर्चा असताना पवार काका पुतणे देखील एकत्र येण्याच्या मार्गावर आहेत का याची चर्चा राज्याच्या राजकारणात जोर धरू लागली आहे.

शरद पवारांच्या भेटीबद्दल बोलताना अजित पवार म्हणाले की, साखरपुडा कार्यक्रम परिवारातील आहे. बाकीच्यांनी त्यावर काही चर्चा करण्याची गरज नाही. तो पवार कुटुंबियांच्या अंतर्गत प्रश्न आहे. इतर ठिकाणी संस्था म्हणून हजर राहतो. रयत शिक्षण संस्था ही चांगली संस्था आहे. तिथे पण एआय चा कसा वापर करता येईल यावर विचार सुरू आहे. आजची बैठक ही एआय बाबत होती. ज्यातून शेतकऱ्यांचा फायदा होत असेल तर या गोष्टी आहेत त्या केल्या पाहिजेत. अशा वेळी एकत्रित बसावं लागतं. सगळे इतर नेते पण एकत्र बसतात. काही विषय राजकारण पलीकडे बघायचे असते. निवडणुका झाल्या आहे. जनतेच्या काही अपेक्षा आहे. माहिती, विचारांची देवाणघेवाण करणं ही आपली संस्कृती आहे.

# बारामती एमआयडीसीत स्क्रॅपच्या गोडाऊनला आग

बारामती । प्रतिनिधी

बारामती औद्योगिक वसाहतीमधील एका स्क्रॅप मटेरीअलच्या गोडावूनला आग लागल्याची घटना सोमवारी (दि २१) दुपारी घडली. उन्हाचा प्रचंड तडाखा आणि त्यात लागलेली आग यामुळे क्षणार्धातच ही आग प्रचंड भडकली. धुराचे लोटच्या लोट आकाशात उडू लागले. दूर अंतरावरूनही या आगीचा अंदाज येवू लागला.

सोमवारी दुपारी अचानक लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररुप धारण केले. त्यामुळे आग धुमसत असल्याचे चित्र होते.आगीची तीव्रता मोठी असल्याने सर्वत्र धुराचे साम्राज्य निर्माण झाले होते. भडकलेल्या आगीचे लोट पाहून अनेकांच्या काळजात धडकी भरली. एमआयडीसीतील अग्नीशामक दलाच्या वाहनांनी तातडीने पोहचत आग आटोक्यात



आणण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरुच ठेवले होते. मात्र, आगीची तीव्रता मोठी असल्याने आग कित्येक तास धुमसत राहिली.

आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु यापूर्वीही स्क्रॅप गोडावूनला आग लागल्याच्या घटना एमआयडीसीत घडल्या आहेत. स्क्रॅप गोडावून धारकांनी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध ठेवणे गरजेचे बनले आहे. दरम्यान या आगीत कोणतीही जीवीतहानी झालेली नसल्याचे प्राथमिक वृत्त आहे. मात्र, स्क्रॅप मटेरील मोठ्या प्रमाणात जळाल्याने लाखों रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे. एमआयडीसीतील भारत फोर्ज कंपनीच्या पाठीमागील बाजुस हे गोडावून आहे.

# पुण्यात पिंक ई-रिक्षा वाटप कार्यक्रम; अजित पवारांनी पुरुष प्रवाशांचे फोटो काढण्याचा महिलांना दिला सल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यातील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे आज पिंक ई-रिक्षा वाटपाचा भव्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात पात्र महिलांना ६० पिंक ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले. महिला व बालविकास विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या या योजनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात ४,००० महिलांना रिक्षा वाटपाचे उद्दिष्ट आहे.

पहिल्या टप्प्यात १,७२६ लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली असून, यापैकी ६० महिलांना आज रिक्षांच्या चाव्या देण्यात आल्या.

अजित पवार यांनी यावेळी बोलताना या योजनेचे सामाजिक परिवर्तनातील महत्त्व अधोरेखित केले.




ही योजना महिलांना सक्षम आणि बळकट करण्यासाठी आहे. यातून रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून, महिला समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील. प्रवासासाठी पिंक रिक्षांचा प्राधान्याने वापर करावा, कारण त्या सुरक्षित आणि विश्वासार्ह आहेत. यावेळी त्यांनी पुरुष प्रवाशांचे फोटो काढण्याचा सल्ला देत, सुरक्षिततेसाठी हा उपाय उपयुक्त ठरेल. काही विकृत मानसिकतेचे लोक असतात, त्यांच्यापासून सावध राहण्यासाठी हे गरजेचे आहे, असाही सल्ला अजित पवार यांनी दिला.

'लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही'

यावेळी अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेच्या यशाचाही उल्लेख केला. लाडकी बहीण योजनेला विधानसभा निवडणुकीत महिलांनी मोठा पाठिंबा दिला. ही योजना कधीही बंद होणार नाही. कुणी कितीही अफवा पसरवल्या, तरी महिलांच्या सन्मानासाठी ही योजना सुरू राहील, असे ठामपणे सांगितले. यावेळी त्यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील योजनांचेही कौतुक केले.

दरम्यान, या कार्यक्रमाला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवड आयुक्त शेखर सिंग, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते.

# खुन प्रकरणातील आरोपी २४ तासाच्या आत जेरबंद; आंबेगाव पोलिसांची कडक कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

जमीनीच्या वादातुन तरुणाचा निर्घुन खुन करुन पसार झालेल्या आरोपींना सोलापूरातील मोहोळ येथुन २४ तासाच्या आत जेरबंद करण्यात आले. ही कारवाई आंबेगाव पोलिसांनी केली. आरोपींच्या मागावर पोलिसांची चार पथके होती. एका हॉटेलमध्ये जेवणाचे पार्सल घेण्यासाठी आरोपी थांबले असताना पोलिसांच्या जाळ्यात सापडले.

अमर दिलीप साकोरे (४० रा. संतोषनगर, कात्रज ), मंदार मारुती किवळे ( ३५ , रा. नवीन वसाहत, कात्रज), गिरीष सुभाष बाबरे (२६, रा संतोषनगर, कात्रज) आणि योगेश बाबुराव डोरे ( ३५ , रा. खोपडेनगर कात्रज ) यांना अटक करण्यात आली. शुभम सुभाष चव्हाण



असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचा हॉटेल व्यवसाय होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार रविवारी पहाटे कात्रज येथील साईछत्र अपार्टमेंटच्या मागे शुभम चव्हाणचा बांबू आणि दांडक्याच्या सहाय्याने खून करण्यात आला होता. याप्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर चार पथके आरोपींच्या मागावर पाठवली होती. तांत्रीक विश्लेषणात आरोपी हे मोहोळ येथील कामती गावात असल्याची माहिती मिळाली.

त्यानूसार पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर व पोलीस अंमलदार हणमंत मासाळ, धनाजी धोत्रे, नितीन कातुर्डे यांचे पथक मोहोळला गेले. त्यांना आरोपी हे मंगळवेढा ते सोलापुर महामार्गावरील कामती येथील हॉटेल समाधान समोर मिळुन आले. तेथे ते जेवणाचे पार्सल घेण्यासाठी थांबले होते. यातील एका आरोपीचे नातेवाईक कामती गावात रहातात . या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती देवधर करत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त प्रविणकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त स्मार्तना पाटील, सहा. पोलीस आयुक्त राहुल आवारे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती देवधर, भोजलींग दोडमीसे, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर, राजेंद्र वंजारी, पोलीस अंमलदार राजेश गोसावी, हणमंत मासाळ, गणेश दुधाने, प्रसाद टापरे, चेतन गोरे, निलेश जमदाडे, देवकर, प्रकाश विटेकर यांच्या पथकाने केली.

# आधी दोषमुक्त आता पुन्हा चौकशीचा ससेमिरा; आदर्श शाळा उभी करणाऱ्या शिक्षकावर कारवाईची छडी?

**खोर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेने सर्व आरोपातून दोषमुक्त केलेल्या शिक्षकाची पुन्हा त्याच चौकशीची फाईल उघडण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षक युवराज घोगरे हे पुन्हा एकदा वादाच्या भोवर्यात सापडले आहेत.

दौंड तालुक्यातील विठ्ठलवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही संपूर्ण महाराष्ट्रभर एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. लोकसहभागातून आदर्श केलेली ही शाळा ज्या शिक्षकाच्या कल्पनेतून नावारूपाला आली, त्या शिक्षकावर कोरोना काळात शाळा बंद असतानाही सन २०२१ मध्ये राजकीय दबावातून खोटे आरोप ठेवून विभागीय खातेनिहाय चौकशी लावण्यात आली. तसेच शाळेतून बदली करण्यात आली. पुढे त्यांच्यावर केलेला एकही




आरोप सिद्ध न झाल्यामुळे मार्च २०२४ मध्ये पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकार्यांनी शिक्षक युवराज घोगरे यांना दोषमुक्त जाहीर केले.

दरम्यानच्या काळात त्यांची पारगाव केंद्रात केलेली बदली रद्द करावी लागली. मात्र, घोगरे हे दोषमुक्त ठरल्यामुळे तसेच बदली रद्द झाल्यामुळे तक्रार करणार्यांचा हेतू सफल झाला नाही. त्यामुळे पुढेही या तक्रारदाराने खोट्या तक्रारी करणे सुरूच ठेवले. मात्र, आरोपांची ज्या ज्यावेळी चौकशी झाली त्या त्यावेळी आरोप खोटे असल्याचेच चौकशी समितीला आढळून आले असल्याची माहिती शिक्षक युवराज घोगरे यांनी दिली.

सततच्या तक्रारी आणि दबावाला बळी पडून जिल्हा परिषद पुणे यांनी सन २०२१-२२ च्याच जुन्या चौकशीत दोषमुक्त ठरलेल्या आरोपांची वाक्यरचना बदलून पुन्हा जुनेच आरोप घोगरे यांच्यावर ठेवून त्यांची विभागीय खात्याने चौकशी लावली. तसेच गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न पुन्हा सुरू केला असल्याचे घोगरे यांचे म्हणणे आहे. आदर्श शाळा घडवणार्या या प्रामाणिक शिक्षकाला गुन्हेगार ठरवण्याचे प्रयत्न थांबायला हवेत आणि या आदर्श शिक्षकास विद्यार्थ्यांमध्ये रमू द्यावे, अशी भावना विठ्ठलवाडी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# पुणे महापालिकेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान



पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२४- २५ मध्ये पुणे महापालिकाच्या इंटेलिजंट वर्क मॅनेजमेंट सिस्टीम (आयडब्ल्यूएमएस) प्रणालीला द्वितीय क्रमांक मिळाल्याने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महापालिकेचा सन्मान करण्यात आला. यावेळी सहा लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार महपालिकेचे तत्कालीन आयुक्त व एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार, शहर अभियंता प्रसांत वाघमारे यांनी आज मुंबईत स्विकारला. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभाग राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२४-२५ आयोजित केली होती. त्यामध्ये पुणे महापालिकेच्या 'आयडब्ल्यूएमएस' प्रणालीचा प्रस्ताव सादर केला होता.

या प्रणालीमुळे अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार पूर्वगणकपत्रक तयार करण्यापासून ते अंतिम बील देयकाची रक्कम देईपर्यंतची सर्व कामे ऑनलाईन केली जात आहेत. त्यासाठी राज्यात 'आयडब्ल्यूएमएस' प्रणालीला द्वितीय क्रमांकाचे सहा लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर झाले होते. हा पुरस्कार आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# खंडाळा घाटात भीषण अपघात; ट्रकची वाहनांना धडक;बाप-लेकीचा दुर्दैवी मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

अनुराधा धावडेवडगाव मावळ: तीव्र उतारावर नियंत्रण सुटलेल्या भरधाव ट्रकने एकामागून एक पाच वाहनांना जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत कारमधील बाप-लेकीचा दुर्दैवी जागीच मृत्यू झाल्याची घटना जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाट रविवारी रात्री उशिरा घडली.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ट्रक मुंबईच्या दिशेने जात असताना खंडाळा घाटातील उतारावर ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रकने समोरून येणाऱ्या पाच वाहनांना जोरदार धडक दिली. या धडकेत एका कारमधील सुमारे ४५ वर्षीय पुरुष व त्यांची १३ वर्षांची मुलगी यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच लोणावळा पोलीस, बोरघाट वाहतूक पोलीस व स्थानिक आपत्कालीन बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तत्काळ रुग्णालयात



हलवण्यात आले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली आणि काही वेळात महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली. दरम्यान, अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, लोणावळा पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी चालकाचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

या अपघातामुळे खंडाळा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, बाप-लेकीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुर्दैवाचा डोंगर कोसळला आहे. स्थानिक नागरिकांनी घाटमार्गावरील वारंवार होणाऱ्या अपघातांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाकडून कठोर उपाययोजनांची मागणी केली आहे.

# चोरीला गेलेले ३५ मोबाईल परराज्यातून व परजिल्ह्यातून केले हस्तगत, शिरूर पोलिसांची दमदार कारवाई

**शिरूर । प्रतिनिधी**

गेल्या सहा महिन्याच्या अवधीत शिरूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेलेले व गहाळ झालेले तब्बल ३५ मोबाईल शोधून काढण्याची महत्वपूर्ण कामगिरी शिरूर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने केली. सुमारे सात लाख रूपये किंमतीचे हे मोबाईल असून, आज शिरूर पोलिस ठाण्याच्या आवारात हे मोबाईल समारंभपूर्वक संबंधितांकडे सुपूर्द करण्यात आले.

शिरूर बसस्थानक, मुख्य बाजारपेठ, आठवडे बाजार व गर्दीच्या ठिकाणांहून मोबाईल हरविण्याचे किंवा चोरीला जाण्याचे प्रकार गेल्या सहा महिन्यांत वाढल्यानंतर व त्याबाबत शिरूर पोलिस ठाण्यात अनेक फिर्यादी दाखल झाल्यानंतर शिरूर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने गंभीर दखल घेतली. पोलिस निरीक्षक



संदेश केंजळे, उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलिस कॉन्स्टेबल विजय गजानन शिंदे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध सुरू केला. यात कॉन्स्टेबल शिंदे यांनी विशेष पुढाकार घेऊन गहाळ मोबाईल उच्च तांत्रिक यंत्रणेद्वारे ट्रेसिंग ला लावून प्रथम लोकेशन शोधून काढले. यातील अनेक मोबाईल हे परराज्यात आणि काही परजिल्ह्यात कार्यरत होते. गहाळ मोबाईलचे लोकेशन निश्चीत केल्यानंतर संबंधित ठिकाणच्या पोलिस ठाण्याशी तसेच मोबाईल वापरत असलेल्यांशीही संपर्क साधून, पत्रव्यवहार करून विविध ठिकाणच्या पोलिसांच्या सहकार्याने हे मोबाईल जप्त केले.

पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या हस्ते संबंधितांना हे मोबाईल वितरीत करण्यात आले. जिल्हा पोलिस अधिक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधिक्षक रमेश चोपडे व शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केल्याचे त्यांनी नमूद केले. हरविलेले मोबाईल मिळाल्यानंतर अनेकांनी आनंद व समाधान व्यक्त केले. फळविक्रेत्या महिला, भाजीविक्रेते, कामगार, मजूर यांचे चेहरे मोबाईल परत मिळाल्याने समाधानाने उजळून निघाले. यातील मिठू गदादे यांनी पोलिसांच्या या कामाचे कौतुक केले. चोरीला गेलेले किंवा बाजारात, वाहनात बसताना पडून गहाळ झालेले मोबाईल परत मिळण्याबाबत अनेकांनी आशा सोडून दिली होती. परंतू काल व आज यातील अनेकांना पोलिस ठाण्यातून मोबाईल सापडल्याचे सांगण्यात आल्याने व ते ताब्यात घेण्यासाठी बोलावण्यात आल्याने व आज प्रत्यक्षात अनेक दिवसांपूर्वी हरविलेला मोबाईल हाती पडल्याने अनेकांना सुखद धक्का बसला. शिरूर पोलिसांच्या कामाचे यावेळी अनेकांनी कौतुक केले.

# छत्रपती सहकारी साखर कारखानाच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार घेणार उमेदवारांच्या मुलाखती

बारामती । प्रतिनिधी

छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी गुरुवार दि(२४) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. यावेळी क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे देखील उपस्थित असणार आहेत. बारामती शहरातील इंम्पेरीअल बँक्केट हॉलमध्ये मुलाखती पार पडतील. श्री जय भवानी माता पॅनलच्या माध्यमातून निवडणूक लढवली जात असून बहुचर्चित छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत कोणाला तिकीट मिळणार कुणाचा पत्ता कट होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.




गुरुवारी सकाळपासून उमेदवारांच्या मुलाखतीला सुरुवात होईल. यामध्ये गटनिहाय मुलाखती असल्याने जास्त गर्दी होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे असे संयोजकांनी सांगितले. सकाळी ९ ते १० गुणवडीच्या सहाव्या गटातील उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत

सकाळी दहा ते अकरा सोनगाव या पाचव्या गटातील अर्ज भरलेल्या उमेदवारांची मुलाखत होणार असून ११ ते १२ या वेळेत लासुर्णे गटातील उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत, तर दुपारी बारा ते एक या वेळेत दुसऱ्या क्रमांकाच्या सणसर मधून अर्ज भरलेल्या उमेदवारांची मुलाखत होणार आहे. दुपारी दोन ते तीन या वेळेत उद्धट गटातील तर दुपारी तीन ते चार या वेळेत अंथुर्णे गटातील उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत.

या व्यतिरिक्त गटातील व गटामधून इतर सर्वसाधारण जागांसाठी उमेदवारी मागितलेल्या उमेदवारांनी उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक व समन्वयक किरण गुजर यांनी केले आहे.

# इंदापुरात डॉक्टरला मारहाण; तिघांविरोधात गुन्हा

इंदापूर । प्रतिनिधी

इंदापूर शहरातील साईसेवा क्लिनिकमध्ये डॉ. प्रदीप दडस यांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी तिघा जणांविरोधात इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील डॉक्टर संघटनेच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करीत पोलिसांना निवेदन देत आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, इंदापूर शहरातील भार्गवराम बगीचालगत असलेल्या जुन्या अकलूज मार्गावर डॉ. प्रदीप दडस यांचे साईसेवा क्लिनिक आहे. शनिवारी (दि. १९) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास नाना कोळेकर (रा. तरंगवाडी, ता. इंदापूर), दयानंद रामचंद्र जाधव आणि रवींद्र भंडलकर (दोघे रा. कौठळी, ता. इंदापूर) हे रुग्णालयात आले.त्यांनी कंपाउंडर आणि डॉ. दडस यांचे भाऊ यांना मारहाण केली, तसेच डॉ. दडस यांच्या उजव्या हातावर लोखंडी स्टुलने वार करत त्यांना गंभीर दुखापत करीत लाथा-बुक्क्यांनीही देखील मारहाण करण्यात आली. यावरून इंदापूर पोलिस ठाण्यात वरील तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.